MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक संशोधन पत्रिका

# विद्यावार्ता™

Jan. To March 2018
Issue-23, Vol-01

Date of Publication
31 March 2018

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

14) PETROLOGY AND GEOCHEMISTRY OF DECCAN BASALT-FLOWS .....
P. U. Terker, A. V. Tejankar || 69

15) INDUSTRIAL SICKNESS AND BACKWARDNESS IN BIHAR WITH .....
Rambabu Yadav || 73

16) Employee Retention – A Need For Present Era
Dr. Jayant Prabhakar Bobde || 79

17) Growth and Equity in Higher Education in India
Dr. Bhavesh N. Desai || 83

18) Demonetization in India: Myth and Reality
Dr. B. D. Karhad || 87

19) REVISING THE MYTHICAL FEMININE CHARACTERS ......
Dr. Ansa C Prasad || 92

20) Influence of Politics on Education System of India
Dr. Sudhir Kumar Rai || 99

21) FOOD SAFETY AND STANDARDS LEGISLATIONS: AN ANALYSIS
ROBIN KUMAR || 102

22) Gender Based Violations and Discrimination in India
Dr. Rupali Sharma || 107

23) अल्लाउद्दीन खिलजीची बाजार नियंत्रण व्यवस्था
डॉ. एच. आर. चौधरी || 111

24) महात्मा जोतिबा फुले याचे सामाजिक कार्य आणि विचार
प्रा. महेंद्र पाटील || 113

25) सावरकरांच्या कवितेतील राष्ट्रीयत्व
प्रा. डॉ. किरण नामदेव पिंगळे, || 117

26) प्रादेशिक सहकार्य आणि सार्क संघटना
प्रा. संतोष महादेवराव घुगे || 120

27) 'नांदेड जिल्ह्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या बचतीचे स्वरूप .....
जितेंद्र पांडूरंगराव काळे || 128

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukrar...

27

# 'नांदेड जिल्ह्यतील शासकीय कर्मचाऱ्यांच्या बचतीचे स्वरूप : एक अर्थशास्त्रीय अभ्यास ''

जितेंद्र पांडूरंगराव काळे
अर्थशास्त्र विभागप्रमुख
स्वामी विवेकानंद महाविद्यालय,
मुक्रमाबाद ता.मुखेड जि.नांदेड

**********

## प्रस्तावना

भारतासारख्या विकसनशील देशात बचतीचे महत्त्व सर्वाधिक आहे. कारण आर्थिक विकासाची गती वाढणारा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे भांडवल होय. जो राष्ट्रीय बचतीवर अवलंबून असतो. राष्ट्रीय उत्पन्नाचा एक मोठा भाग बचतीकडे वळविला व त्याची गुंतवणूक केली तर देशातील उत्पन्न पातळी वाढते. त्याचबरोबर विकासासाठी एक भक्कम पायाही रचला जातो. यासाठी मोठ्या प्रमाणात बचत करणे आवश्यक आहे. कारण बचत जेवढी जास्त तेवढी गुंतवणूक व भांडवलनिर्मिती अधिक हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. भारतातील उत्पन्नाचे स्त्रोत हे बहुतांशी अनिश्चित स्वरूपाचे असल्यामुळे बचत प्रक्रिया ही एखाद्या आघात प्रतिबंधक यंत्रासारखी भूमिका पार पाडते. विकासाच्या प्रक्रियेत भारतासमोर आवश्यक भांडवलाचा यक्ष प्रश्न उभा आहे. कारण दारिद्र्याचे दुष्टचक्र, अल्पप्रमाणातील बचत, अल्पप्रमाणातील गुंतवणूक आणि तुटपुंज्या रोजगाराच्या संधी इत्यादीवर योग्य मात करण्यासाठी भारतामध्ये बचत आणि गुंतवणूक या दोहोंच्याही प्रमाणात वाढ होणे आवश्यक आहे. देशातील नियोजन यशस्वी करण्यासाठी व आर्थिक स्वावलंबन प्राप्त करण्यासाठी बचतीचा दर वाढवणे आवश्यक असल्याचे मत नियोजनकारांनी वेळोवेळी स्पष्ट केले आहे. देशात बचतदर वाढीसाठी कौटुंबिक घटक, सार्वजनिक क्षेत्रातून होणारी बचत आणि खाजगी क्षेत्रातून होणारी बचत परिणामकारक ठरते. बचत ही भांडवलनिर्मितीचा आणि निर्माण झालेल्या भांडवलातून योग्य अशा आर्थिक विकासाचा पाया उभारतो.

भारतामधील बचतीचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून आले की, बाजारमूल्याच्या तुलनेत जीडीपीच्या १९५०–५१ मध्ये बचतीचा दर हा १०.२ टक्के होता तर २०१०–११ मध्ये हा दर ३२.३ इतका होता. भारतात एकूण बचतीत कुटुंबाने केलेल्या बचतीचा वाटा अधिक आहे. केंद्रीय सांख्यिकीय संघटन व भारतीय रिझर्व्ह बँक यांच्या मतानुसार भारतीय अर्थव्यवस्थेत बचत आणि उपभोगासंबंधी असलेल्या अंदाजात ताळमेळ आणणे आवश्यक आहे.

एखाद्या देशाच्या आर्थिक विकासाच्या संदर्भात ऐच्छिक बचतीची प्रक्रिया महत्त्वाची भूमिका पार पाडते परंतु पाश्चिमात्य उद्योगप्रधान देशात भांडवलनिर्मितीच्या कार्यात खाजगी क्षेत्राचे योगदान सर्वाधिक आहे. व्यक्तीकडून करण्यात येणारी बचत किंवा संपत्ती संचय त्या व्यक्तीस किंवा कुटुंबास भविष्यकालीन आकस्मिक उद्‌भवणाऱ्या समस्यांपासून स्वतःचा बचाव करण्यास उपयुक्त ठरते. त्याचबरोबर भविष्यकालीन प्रभावी सुरक्षा कवचही ठरू शकते. राष्ट्रीय स्तरावरील बचत ही त्या राष्ट्राची अर्थव्यवस्था भक्कम करण्याचे माध्यम ठरते. स्वातंत्र्योत्तर काळात जरी विविध क्षेत्रांचा विकास झाला असला तरी आजही बचत व गुंतवणुकीच्या संदर्भात काही मूलभूत प्रश्न दिसून येतात. देशातील बचत व भांडवल निर्मितीचे प्रमाण कमी आहे. एकूण राष्ट्रीय व दरडोई उत्पन्न वाढूनही बचत व गुंतवणुकीचा दरात वाढ होत असलेले दिसून येत नाही. देशातील कुटुंब बचत करण्यास का प्रवश्त होतात याची अनेक कारणे सांगता येतील. जसे की, वश्द्धापकाळाची सोय करणे, मुला–मुलींच्या लग्नासाठी, आकस्मिक खर्च निघाल्यास बचतीचा वापर करता येतो. आजारपण इतर अनपेक्षित दुर्घटनांची तरतूद इत्यादी कारणांमुळे भारतीय कुटुंब बचत करण्यास प्रवश्त होतात. या पार्श्वभूमीवरच 'नांदेड जिल्ह्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या बचतीचे स्वरूप' अभ्यासण्यात आले आहे.

बचत करण्यासाठी आपल्या उपभोग खर्चावर



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

नियंत्रण ठेवावे लागते. केलेली बचत ही दोन प्रकारची असते. एक वित्तीय स्वरूपाची जसे की, बँकेत ठेवी ठेवणे, पिग्मी काढणे, पोस्टाच्या विविध योजनांमध्ये पैसा गुंतवणे, कर्जरोखे, विविध कंपन्यांचे शेअर्स, जीवन विम्यामध्ये गुंतवणूक करणे आणि दुसरे म्हणजे वस्तुरूपी बचत जसे की, शेती खरेदी करणे, घर, प्लॉट, फ्लॅट खरेदी करणे, सोने खरेदी करणे आदी प्रकारच्या बचती केल्या जातात.

**नांदेड जिल्हा**

मराठवाडा विभागात एकूण ८ जिल्हे आहेत. मराठवाड्यात औरंगाबादनंतर एक अत्यंत महत्त्वाचा जिल्हा म्हणून नांदेडची स्वतंत्र ओळख आहे. नांदेड हे शहर गोदावरी नदीकाठावर वसलेले एक ऐतिहासिक शहर आहे. हे शहर शीख धर्मियांचे श्रद्धास्थान आहे. नांदेड जिल्ह्यात एकूण १६ तालुके असून भौगोलिकदृष्ट्या हा जिल्हा क्षेत्रफळाच्या दृटीने मोठा आहे. कंधार येथे ऐतिहासिक किल्ला आहे तर माहूर येथे रेणुकादेवीचे प्रेक्षणीय स्थळ आहे.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात नांदेडला खंबीर राजकीय नेतृत्त्व लाभले. कै.शंकरराव चव्हाण आणि अशोकराव चव्हाण या पितापुत्रांनी नांदेड जिल्ह्याचा चौफेर विकास केला. त्यात गोदावरी पाटबंधारे विभाग, विश्णूपुरी प्रकल्प, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय, जिल्हा परिषद, पंचायत समिती कार्यालय, पोस्ट ऑफिस, न्यायालये, पोलिस स्टेशन, विविध ग्रामीण रुग्णालये, भारत संचार निगम लिमिटेड, कृशि कार्यालये, अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, वैद्यकीय महाविद्यालय, भूमी अभिलेख कार्यालय, कापूस व केळी संशोधन केंद्र, वन विभाग, विक्रीकर विभाग अस्तित्वात असून या कार्यालयात विविध श्रेणीचे शासकीय कर्मचारी काम करतात.

**बचतीची संकल्पना**

व्यक्ती किंवा कुटुंबाला प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचा दोन प्रकारे उपयोग केला जातो. एकूण उत्पन्नातील काही भाग उपभोगावर खर्च केला जातो तर काही भागाची बचत केली जाते. एकूण उत्पन्नातील जो भाग उपभोगावर खर्च केला जात नाही तो भाग म्हणजे बचत होय. केन्स बचतीच्या संदर्भात म्हणतात की, ''उपभोगावर खर्च झालेली रक्कम उत्पन्नातून वजा केली असता जी रक्कम शिल्लक राहते ती रक्कम म्हणजे बचत होय.'' म्हणजेच केन्सची संकल्पना स्पष्ट करताना

बचत = उत्पन्न&उपभोग खर्च

बचतीचे सूत्र S=Y-C

या सूत्रात म्हणजे (Saving) बचत म्हणजे (Income) उत्पन्न आणि म्हणजे (Consumption) उपभोग. म्हणूनच केन्स म्हणतो की, 'बचत हे उत्पन्नाचे फलित होय.' बचत म्हणजे चालू उत्पन्नाचा असा भाग की जो उपभोगावर खर्च केला जात नाही. केन्स म्हणतो की, बचत हे उत्पन्नाचे फलित आहे म्हणजेच =f (Y) याचा अर्थ की, जसजशी उत्पन्नात वाढ होते, तसतशी बचतीत वाढ होत असते. बचत प्रवृत्ती ही उपभोग प्रवृत्तीची विरुद्ध प्रवृत्ती होय. बचत प्रवृत्ती खालील प्रमाणे दाखविता येईल.

$$\frac{S}{Y}=1-\frac{C}{Y}$$

वरील सूत्रात $\frac{S}{Y}$ ही बचत प्रवृत्ती म्हणजे बचतीचे उत्पन्नाषी असलेले प्रमाण होय. आणि $\frac{C}{Y}$ ही उपभोगप्रवृत्ती म्हणजे उपभोगाचे उत्पन्नाशी असलेले प्रमाण होय.

**उद्दिष्टे**

नांदेड जिल्ह्यातील बचतीचे स्वरूप अभ्यासणे हे प्रमुख उद्दिष्ट समोर ठेवून सदरील शोधनिबंध तयार करण्यात आला आहे.

**संशोधन पद्धती**

सदरील शोधनिबंधासाठी द्वितीय सामग्रीत वापरण्यात आलेली असून विविध शासकीय कार्यालयातील माहिती, विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट इत्यादींच्या माध्यमातून आवश्यक ती माहिती संकलित करुन त्या माहितीचे विश्लेषण केले आहे.

**बचतीचे स्वरुप**

नियमित बचत करण्याचे प्रमाण खूप कमी



PRINCIPAL ...nd Mahavidyala Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nand...

आहे. काही कर्मचाऱ्यांनी घर खरेदीत बचत केली आहे तर काहींनी विम्यामध्ये पैसा गुंतवलेला आहे. बँकेत वा इतर स्वरूपात बचत केलेली दिसून आली नाही.

नांदेड जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांच्या बचतीवर प्रभाव टाकणाऱ्या घटकांचा अभ्यास केला असता असे दिसून आले की, कर्मचाऱ्यांनी बचत करावी असा एकही प्रभावी घटक दिसून आलेला नाही. फार तर मुलांच्या शिक्षणासाठी व लग्नासाठी बहुतांश कर्मचाऱ्यांनी बचत केल्याचे दिसून येते.

कर्मचाऱ्यांच्या बचतीवर धर्माचा, कुटुंबातील सदस्यसंख्येचा, अपत्यांचा, लिंगभेदाचा व वयाचा असणारा प्रभाव अभ्यासला असता दिसून आले की, ज्या कुटुंबात सदस्य संख्या जास्त आहे तेथील बचतीचे प्रमाण अत्यल्प आहे, परंतु वय, लिंगभेद, धर्म यांचा प्रभाव बचतीमध्ये दिसून आलेला नाही.

कर्मचाऱ्यांच्या पदश्रेणीनुसार बचतीचे प्रमाण तपासले असता असे दिसून आले की, 'क' व 'ड' वर्ग श्रेणीतील कर्मचाऱ्यांना मिळणारा पगार हा कमी असल्यामुळे खर्चाची जुळवाजुळव करण्यातच ते व्यस्त असतात त्यामुळे ते कर्मचारी बचत करू शकत नाहीत, परंतु 'अ' व 'ब' वर्ग श्रेणीच्या कर्मचाऱ्यांना मिळणारा पगार हा अधिक असल्यामुळे ते बचत करतात.

कर्मचाऱ्यांच्या बचतीचे त्यांच्या कौटुंबिक विकासातील उपयुक्तता तपासली असता असे दिसून आले की, मुला–मुलींचे शिक्षण, लग्न, घरातील सदस्यांचे आजारपण, घरातील उपयोगी वस्तू, घर, शेतीसाठी लागणारा खर्च इत्यादीकरिता बचत केल्यामुळे फायदाच होतो.

वेतन अधिक असणाऱ्या कर्मचाऱ्यांचे बचतीचे प्रमाण अधिक आहे. कारण त्यांना मिळणाऱ्या पगारातून त्यांच्या व कुटुंबाच्या गरजा भागवून हाती शिल्लक पैसा उरतो. त्यामुळे ते बचत करू करतात, चैनीच्या वस्तू खरेदी करतात. पगार अधिक मिळत असल्यामुळे निम्न श्रेणीच्या कर्मचाऱ्यांपेक्षा त्यांच्या बचतीचे प्रमाण अधिक आहे.

कर्मचाऱ्यांच्या वर्गवारीनुसार बचतीचे स्वरूप व प्रमाण बदलते कारण 'अ' वर्ग श्रेणीच्या कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या सुविधा, भत्ते व पगार हे अधिक असल्यामुळे त्यांच्या बचतीचे स्वरूप अधिक व्यापक व ते विविध प्रकारांमध्ये बचत करत असतात. परंतु 'ब', 'क', 'ड' या वर्गश्रेणीच्या कर्मचाऱ्यांचे पगार 'अ' वर्गाच्या तुलनेत कमी असल्यामुळे त्यांच्या बचतीचे स्वरूप कमी व आवश्यक त्या प्रमाणातच ते बचत करतात.

कर्मचाऱ्यांचा कल हा विविध स्वरूपाच्या बचतीकडे असल्याचे दिसून येते. कारण भौतिक स्वरूपात बचत केली तर ती सांभाळायची कोणी असा प्रश्न निर्माण होत असल्याचे दिसते. उदा. शेती खरेदी केली तर ती कसायची कोणी? त्याकडे लक्ष कुणी द्यायचे? घर खरेदी केले तर सतत होणाऱ्या बदलीमुळे तेही फारसे उपयोगात येणार नसते. त्यामुळे रोख स्वरूपातील बचतीकडे कर्मचाऱ्यांचा कल अधिक आहे. कारण आवश्यक असेल तेव्हा या बचतीचा उपयोग करता येतो.

कर्मचाऱ्यावर अवलंबून असणारे कुटुंब जर मोठे असेल तर त्यांच्या गरजा पूर्ण करण्याबरोबरच घरातील इतर खर्चही त्यास सांभाळावे लागतात. त्यामुळे हाती पैसा उरत नाही, पर्यायाने ते बचत करू शकत नाहीत. काही अत्यावश्यक प्रमाणात बचत करतात परंतु त्यांची बचत लहान कुटुंब व सदस्यसंख्या कमी असणाऱ्यांपेक्षा खूपच कमी असते.

धर्मपरत्वे कर्मचाऱ्यांच्या बचतीच्या प्रमाणात फरक पडतो असे म्हणता येणार नाही. कारण बचत ही सर्वच धर्मांचे लोक करतात. सर्वांनाच बचतीचे महत्त्व माहीत आहे. त्यामुळे धर्मपरत्वे बचतीमध्ये फरक पडत नाही. आपल्या व आपल्या कुटुंबीयांच्या गरजा भागवून जर चार पैसे शिल्लक राहत असतील तर प्रत्येकजण तो पैसा कुठे ना कुठे तरी गुंतवतोच मग तो कुठल्याही धर्माचा असेल तरी.

शासकीय कर्मचाऱ्यांच्या बचतीवर धर्माचा, कुटुंबातील सदस्यसंख्येचा, अपत्याचा, लिंगभेदाचा व वयाचा असणारा प्रभाव अभ्यासल्यानंतर असे लक्षात आले की, अशा प्रकारचा कुठलाही प्रभाव नाही. कारण बचत ही धर्म, अपत्य, लिंगभेदावर अवलंबून नसते. ही बाब येथे प्रकर्षाने जाणवली आणि ती म्हणजे ज्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील सदस्य संख्या जास्त आहे, त्यांना बचत करणे जमत नाही. ज्या



PRINCIPAL
...anand Maha...
Mukramabad Tq.Mukhed Di...

कर्मचाऱ्यांना मुली आहेत असे कर्मचारी रुढी परंपरेनुसार मुलीच्या विवाहासाठी खर्च करावा लागतो म्हणून बचत करीत असल्याचे दिसून आले. परंतु मुलगा अपत्य असणारे कर्मचारी मात्र केवळ मुलांच्या शिक्षणासाठी बचत करीत असल्याचे सांगितले. त्यामुळे स्त्री अपत्य असणाऱ्या कर्मचाऱ्यांची बचत तुलनेने अधिक दिसून आली.

शासकीय कर्मचाऱ्यांच्या पदश्रेणीनुसार बचतीचे प्रमाण तपासले असता असे आढळून आले की, श्रेणी क व ड च्या कर्मचाऱ्यांच्या बचतीचे प्रमाण अत्यल्प असून ब व अ श्रेणीतील कर्मचारी हे चांगल्या प्रकारे बचत करू शकतात व ते करतात. परंतु प्रत्यक्ष एकाही कर्मचाऱ्याने असे नमूद केले नाही की कुठे ठेवी अथवा कर्जरोखे आहेत ते, परंतु जीवनविम्यामध्ये बचत करत असल्याचे काही जणांनी नमूद केले आहे.

वेतन अधिक असणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांचे बचतीचे प्रमाण देखील अधिक आहे. कारण त्यांना मिळणाऱ्या वेतनातून ते आपल्या व आपल्या कुटुंबाच्या गरजा पूर्ण करून उरलेला पैसा बचतीमध्ये गुंतवतात त्यामुळे कमी वेतन असणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यापेक्षा अधिक वेतन असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बचतीचे प्रमाण अधिक आहे.

शासकीय कर्मचाऱ्याच्या वर्गवारीनुसार बचतीचे स्वरूप व प्रमाण बदलते. कारण शासकीय कर्मचाऱ्यांची वर्गवारी ही 'अ', 'ब', 'क' व 'ड' श्रेणीमध्ये होते. त्यानुसार त्यांचे वेतनमान ही कमी–जास्त असते. अ श्रेणी व ब श्रेणी वर्गवारीतील कर्मचाऱ्यांना मिळणारे वेतन हे अधिक असते तर त्याच बरोबर क व ड श्रेणीतील कर्मचाऱ्यांना मिळणारे वेतन कमी असते आणि आपल्या व आपापल्या कुटुंबाच्या गरजा भागवण्यातच ते वेतन खर्ची होते. त्यामुळे वर्गवारीनुसार त्यांच्या बचतीचे प्रमाणसुद्धा बदलत असते.

शासकीय कर्मचाऱ्यांचा कल वित्तीय स्वरूपाच्या बचतीकडे अधिक असतो. कारण स्थावर मालमत्ता किंवा इतर बचत केली असता त्यातून मिळणारा परतावा हा निश्चित स्वरूपाचा नसतो आणि शासकीय कर्मचाऱ्यांच्या इतरत्र बदल्या होत असल्याकारणाने अशा स्वरूपात बचत करणे त्यांना सोयीचे नसते. म्हणून ते वित्तीय स्वरूपाच्या बचतीमध्ये अधिक गुंतवणूक करतात.

## निष्कर्ष :

शासकीय कर्मचाऱ्यांवर अवलंबून असणाऱ्या कुटुंबातील सदस्यसंख्या जास्त असेल तर त्यांच्याकडून केली जाणारी बचत देखील कमी असते. कारण कुटुंबाच्या गरजा व त्यांच्या आरोग्याची काळजी यातच येणारे वेतन खर्च होत असल्यामुळे त्यास खर्चाची जुळवाजुळव करण्यातच दमछाक होते. त्यामुळे हातात शिल्लक राहत नसल्यामुळे तो बचत करूच शकत नाही आणि काटकसर करून केलीच तर ती फार अल्प प्रमाणात असते.

धर्मपरत्वे कर्मचाऱ्यांच्या बचतीच्या प्रमाणात फरक पडतो असे काही नाही, कारण धर्मावरून बचत ठरत नाही तर त्या कुटुंबातील सदस्य संख्या, त्यांच्या गरजा यावरून बचत किती करता येईल ते निश्चित करता येते. एखाद्या कुटुंबात जर सदस्यसंख्या कमी असेल, कमावणारे एकापेक्षा जास्त असतील आणि गरजेपुरताच खर्च होत असेल तर ते कुटुंब बचत करू शकते मग ते कोणत्याही का धर्माचे असेना. त्यामुळे धर्मपरत्वे कर्मचाऱ्यांच्या बचतीच्या प्रमाणात फरक पडतो असे म्हणता येणार नाही.

## संदर्भसूची

१. ठक्कर के. एच., स्थूल अर्थशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९४

२. साबळे ए. बी. व भोयर व्ही. एस., समष्टी अर्थशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९२

३. झिंगन एम. एल., समष्टी अर्थशास्त्र, वरंदा प्रकाशन, दिल्ली,

४. पाठक आर. के., समष्टी अर्थशास्त्र, विश्वभारती पब्लिकेशन्स, नई दिल्ली,

५. माहोरे रा. य., समष्टी अर्थशास्त्र, हिमालय पब्लिशिंग हाऊस, मुंबई,

६. ढगे एस. के., समग्रलक्षी अर्थशास्त्र, के. एस. पब्लिकेशन्स, पुणे,

७. कुरुलकर र. पु., भारतीय अर्थव्यवस्था, विद्या प्रकाशन, नागपूर,

८. डॉ. पुरोहित वसुधा, भारतीय अर्थव्यवस्था, शशिकांत पिंपळापुरे विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २००८

ISSN 2319 - 359X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# IDEAL

Volume - VI Issue - II March - August - 2018

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
Journal No. 47026

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2017 - 4.988
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed Dist.Nanded

226

ISSN 2319 - 359X

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# IDEAL

Volume - VI Issue - II March - August - 2018

**Peer Reviewed Referred and UGC Listed Journal**

Journal No. 47026

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2017 - 4.988
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya

| Sr. No. | Author Name | Title | Page No. |
|---|---|---|---|
| १३. | गणेश शाहू शेळके<br>डॉ. दिनकर माने | जागतिकीकरणानंतर मराठी वृत्तपत्रातील अग्रलेखांचे बदलते स्वरूप | ६३-६५ |
| १४. | प्रा. डॉ. बालाजी खराबे | शरचंद्र मुक्तीबोध : समकालीन मराठी कादंबरी | ६६-६९ |
| १५. | प्रा. डॉ. मारोती गायकवाड | दलित कथेचे अध्यापन: स्वरूप व कौशल्य | ७०-७३ |
| १६. | पवार शितल शिवाजी<br>प्रा. डॉ. मनिर शेख | ग्रामीण समुदायाच्या विकासात पंचवार्षिक योजनांचे योगदान : एक अभ्यास | ७४-८० |
| १७. | रवि श्यामराव इंगळे | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या खाजगी पत्रातील सामाजिक विचार | ८१-८३ |
| | | **HINDI** | |
| १ | डॉ. कल्पना वर्मा | मुक्तिबोध और उनकी भूल-गलती | १-३ |
| २ | डॉ. सौ. अरुणा राजेंद्र शुक्ला | अज्ञेय एवं मुक्तिबोध की समकालीन कविता | ४-८ |
| ३. | डॉ. बालाजी जोकरे | हिंदी प्रवासी उपन्यास और अभिमन्यु अनतकृत लाल पसीना | ९-१२ |
| ४. | पूजा अमित सक्सेना | चित्रकार में कविता का संगम डॉ. मंजुला चतुर्वेदी | १३-१६ |
| ५ | प्रा. डॉ. राजश्री भामरे | वर्तमान हिंदी साहित्य: विद्रोही चेतना बदलते समय का साक्षात्कार – सलाम | १७-२१ |
| ६ | डॉ. हनमंत जी. मलतवाडकर | मन्नू भंडारी जी की कहानियों में 'नारी' एक दृष्टिक्षेप | २२-२६ |


'जिज्ञिअसा' या सहामयि प्रसिध्द झालेली मते मुख्य संपादक, संपादक मंडळ व सल्लागार मंडळास मान्य असतीलच असे नाही. या नियतकालिकात प्रसिध्द करण्यात आलेली लेखकाची मते ही त्याची वैयक्तिक मते आहेत. तसेच शोध निबंधाची जबाबदारी स्वतः लेखकावर राहील.

हे नियत कालिक मालक, मुद्रक, प्रकाशक विनय शंकरराव हातोले यांनी अजिंठा कॉम्प्युटर अॅण्ड प्रिंटर्स, जयसिंगपूरा, विद्यापीठ गेट, औरंगाबाद येथे मुद्रित व प्रकाशित केले.



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

# १४. शरचंद्र मुक्तीबोध : समकालीन मराठी कादंबरी

प्रा. डॉ. बालाजी खराबे
विभागप्रमुख, मराठी विभाग, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद, जि. नांदेड.

## प्रस्तावना

१९४१-४२ च्या सुमारास शरदचंद्र मुक्तीबोध रोमारोलांच्या 'जा क्रिस्तोफ' या कादंबरीच्या वाचनाने भारावून गेले होते. या कादंबरीतील भव्यता, आदर्शनिष्ठा, अंतःकरणात्मक शुद्धता त्यांना विलक्षण वाटली. रोमारोलांच्या अध्यात्मनिष्ठ मानवतावादाने त्यांच्यात जिव्हाळा निर्माण केला. त्यातून भारतीय जीवनावर विशाल कादंबरी लिहिण्याची प्रेरणा त्यांच्या ठिकाणी निर्माण झाली. रोमारोलाप्रमाणे असामान्य नायक उभा करावा असे वाटून गेले. हिंदी कादंबरीकार अज्ञेय यांच्या 'शेखर' कादंबरीतील नायक शेखर हा प्रयोगक नायकही त्यांना जवळचा वाटला. टॉलस्टॉय, दोस्टाव्हस्की, चेकॉव्ह व गोर्की यांच्या वाङ्मयाचा परिचय झाल्याबरोबर नव्या जगाचेच दर्शन घडले.

हरीभाऊ व प्रेमचंदाच्या वाङ्मयाने त्यांच्या मनावर संस्कार केले होते, परंतु या लेखकांच्या वाङ्मयाने मनावर संस्कार केले होतेच. या लेखकाच्या वाङ्मयाने माझ्या संपूर्ण मनावर परिणाम केला व जीवनाच्या वस्तुनिष्ठ व सर्वांगीण स्वरूपाचे दर्शन घडविले. त्यांच्या एवढे जीवनाचे तळस्पर्शी चित्र इतर कोणत्याही कादंबरीकाराने रेखाटले नाही. या कादंबरीकाराने मला जीवनाच्या वस्तुनिष्ठ आकलनाची एक व्यापक दृष्टी दिली. त्याचबरोबर मानवी जीवन हीच एक गूढ व असामान्य गोष्ट आहे हे त्यांनी मला शिकविले. व्यक्ती असामान्य असो की, सामान्य. तिच्याकडे माणूस या नात्याने कसे पहावे ते 'वॉर ॲण्ड पीस' मधील नेपोलीयनच्या चित्रणावरून चांगलेच लक्षात आले. असामान्य नायक उभा करण्याची कल्पना बाजूस सारून मुक्तीबोधानी आपली पहिली कादंबरी 'क्षिप्रा' ही लिहावयास घेतली व बिशू बिश्वास हा तिचा नायक या कादंबरीत उभा केला. त्याचप्रमाणे 'सरहद्द' व 'जन हे वळतू जेथे' याही कादंबऱ्यांची निर्मिती त्यांनी केली.

मुक्तीबोध यांचा जन्म मध्य प्रदेशात जुन्या ग्वाल्हेर संस्थानातील हिंदी भाषिक प्रदेशात मध्यमवर्गीय महाराष्ट्रीय ब्राह्मण कुटुंबात १९२१ साली झाला. वडील पोलिस खात्यात नोकरीला होते. त्यामुळे मराठी समाजापासून ते कुटुंब तसे दूरच राहिले होते. याशोधनिबंधामध्ये शरदचंद्र मुक्तीबोध आणि समकालीन मराठी कादंबरी या विषयाची चर्चा करावयाची आहे.

### मुक्तीबोधकालीन मराठी कादंबरी

मुक्तीबोधांची 'क्षीप्रा' ही कादंबरी १९५४ साली प्रसिद्ध झाली आणि त्यांची शेवटची 'जन हे वळतू जेथे' ही कादंबरी १९६९ साली प्रसिद्ध झाली. १९५० नंतर मराठी कादंबरीला आगळे वेगळे स्वरूप प्राप्त झालेले दिसते. १९५० पर्यंतची कादंबरी प्रामुख्याने मध्यमवर्गीय जाणिवांनी सिमित झालेली असल्यामुळे तिच्यावर वर्गीय मर्यादा पडणे साहजिक होते. १९५० नंतर मध्यमवर्गीय जाणिवांबरोबरच समाजातील इतर वर्गीय जाणिवांनीही अभिव्यक्ती कादंबरी वाङ्मयातून कलात्मक पातळीवर होऊ लागल्याने निदर्शनास येते.



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

ग्रामीण प्रादेशिक कादंबरीबरोबरच राजकीय, ऐतिहासिक, कौटुंबिक व सामाजिक आशयांची कादंबरी या कालखंडात लिहिली गेली. दलित जाणिवांनी देखील या कालखंडात भिन्न अभिनव रूप प्राप्त करून दिले. रंजन आणि बोधवादाच्या जोखडातून मुक्त होऊन कलात्मक पातळीवर अभिव्यक्ती स्वातंत्र्योत्तर काळातच होऊ शकली, असे म्हणता येते.

श्री. ना. पेंडसे हे स्वातंत्र्योत्तर काळातील एक मान्यवर कादंबरीकार होते. त्यांची सुप्रसिद्ध कादंबरी 'गारंबीचा बापू' ही १९५२ साली प्रकाशित झाली. तत्पूर्वी त्यांच्या 'एल्गार' व 'हद्पार' या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या होत्या. या कादंबऱ्यांनी श्री. ना. पेंडसे कडून कलात्मक कादंबरी लेखनाच्या अपेक्षा निर्माण केल्या होत्या. 'गारंबीचा बापू' ही कादंबरी अनेक टिकाकारांच्या प्रशंसेस पात्र ठरली असली तरी तिची कलात्मकता विवादास्पदच ठरली.

यासंदर्भात डॉ. गो. मा. पवार म्हणतात की, 'हा कथेने वाचकांचे रंजन करू पाहणाऱ्या कादंबरीचे रंजन करण्याची सर्व प्रकारची सामग्री पेंडशांनी या कादंबरीत वापरलेली आहे. शिवाय विशेष एवढाच की, वास्तव जीवनाचे चित्रण करणारी ही एक कलात्मक कादंबरी आहे. असा चकवा निर्माण करण्यात ती कोठेतरी यशस्वी ठरली. तिने वास्तव जीवनाचा पृष्ठस्तरावरील आकर्षकपणे पुरविला, परंतु गाभा मात्र स्वप्नरंजनात्मक ठेवला. रूढ रूढी धुडकावून लढणारा बंडखोर नायक निर्माण करण्याचा आभास निर्माण केला, परंतु बंडखोरीच्या या आधुनिकतेच्या मुखवट्याखाली पारंपरिक श्रद्धा, रूढी व मूल्य जपणारा नायक चित्रित करून त्याद्वारे रंजनाचे कार्य साधले. वाचकांना आवडणारी भावनाप्रधानता दर्शविली. माणुसकीसारख्या मूल्यांचा वरपांगी गौरव केला. गोष्टीवेल्हाळ माणसांच्या चटकदार भूल पाडणाऱ्या निवेदनतंत्राचा रंजनासाठी उपयोग केला. 'गारंबीचा बापू' ही प्राधान्याने स्वप्नरंजन करणारी कथा आहे.'[१] श्री. ना. पेंडसे यांनी वास्तव रमणीय करून सांगण्याचा प्रयत्न केला. ही गोष्ट खरी असली तरी वास्तवाच्या नावाखाली स्वप्नरंजनाचा अतिरेक त्यांनी केला हे नाकारता येत नाही.

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील ग्रामीण प्रादेशिक कादंबरीला अनेक कादंबरीकारांनी समर्थ रूप प्राप्त करून दिलेले दिसते. व्यंकटेश माडगूळकर यांची 'बनगरवाडी' (१९५५), उद्धव शेळके यांची 'धग' (१९६०), शंकर पाटील यांची 'टारफुला' (१९६४), रा. रं. बोराडे यांची 'पाचोळा' (१९७१) व आनंद यादव यांची 'गोतावळा' (१९७१). या सर्वच कादंबऱ्यांमधून ग्रामीण जीवनातील वास्तवाचे यथातथ्य रूप यशस्वीपणे साकार करण्याचा प्रयत्न झालेला दिसून येतो.

मराठीतील दलित जाणिवांची अभिव्यक्ती कादंबऱ्यांच्या रूपाने याच कालखंडात अविष्कृत झाली. अण्णाभाऊ साठे यांची 'फकिरा' (१९५९) व बाबुराव बागूल यांची 'सूड' (१९७०) या कादंबऱ्यांमधून दलितांच्या भावजीवनातील संघर्ष व ताणतणाव वेगवेगळ्या पातळ्यांवरून साकार झालेला दिसतो.

मुंबईतील झोपडपट्टीवासीयांच्या जीवनावर लिहिल्या गेलेल्या कादंबऱ्या देखील वाचकांच्या मनावर प्रभाव टाकून गेलेल्या दिसतात. त्यामध्ये जयंत दळवी यांची 'चक्र', मधू मंगेश कर्णिक यांची 'माहिमची खाडी', भाऊ पाध्ये यांची 'वासूनाका' व भा. ल. पाटील यांची 'वस्ती वाढते आहे' या कादंबऱ्यांचा समावेश यामध्ये होतो. विशेष म्हणजे या कादंबऱ्यांचे लेखक मध्यमवर्गीय आहेत. झोपडपट्टीवासियांच्या जीवनातील प्रखर वास्तवाचे चित्र हे सर्वच कादंबरीकार रेखाटतात ते विलक्षण तटस्थतेने. भाऊ पाध्यांच्या 'वैतागवाडी' या कादंबरीत भाडेकरांच्या जीवनातील गंभीर समस्यांचे मार्मिक चित्रण साकार होते. माणसाची जीवनाची आसक्ती आणि तिच्यावर सर्व बाजूंने बंधने घालणारी परिस्थिती या द्वंद्वात माणूस

239

पिळवणूक; निपक्षे, त्याचे चित्रण वरील कादंबऱ्यांतून आलेले आहे. सुप्रसिद्ध कवी व समीक्षक पु. शी. रेगे यांची 'सावित्री' (१९६२) ही पत्रात्मक कादंबरी याच कालखंडात प्रकाशित झाली.

मराठी कादंबरीला समृद्ध करण्यात भालचंद्र नेमाडे यांचा महत्त्वाचा वाटा आहे. त्यांची 'कोसला' (१९६३) ही आशय अभिव्यक्तीच्या दृष्टिने नाविन्यपूर्ण असलेली कादंबरी आहे. यासंदर्भात प्रा. रविंद्र किंमहुणे म्हणतात की, 'जगण्यावर अफाट प्रेम करीत प्राप्तसामाजिक परिस्थितीत निर्मितीक्षम कसे होता येईल. आपला अनुभवजन्य वैताग वांझोटा कसा ठरणार नाही अशा प्रश्नाच्या चिंतनाने सांगवीकर एका मानसिक कोंडीत सापडतो. संरचनात्मकदृष्ट्या विचार करतो असे म्हणता येईल की मुक्तीची जबरदस्त इच्छा आणि प्रत्यक्षात खुंट्यावर यावे लागणे या दोन परस्पर विरोधी तणावातून सांगवीकराची अस्वस्थ मनोवस्था घडत जाते. प्राप्त समाजव्यवस्थेच्या प्रखर वास्तव भानामुळे त्याला लौकिक स्तरावर कुठलाही मार्ग दिसत नाही. कादंबरीत सुचविलेला विहंग मार्ग सांगवीकराचा नाही. व्यक्तीशः सांगवीकरानी ही मानसिक कोंडी फोडलेली आहे. स्वतःपुरता त्याने आपला मार्ग शोधलेला आहे. हा मार्ग प्रत्यक्ष त्याच्या आत्मनिवेदनाचा आहे. या दृष्टिने त्याला बुद्धाविषयी वाटणारा अपार आदर लक्षात घेणे आवश्यक आहे.'[२] नव्या जाणिवा, नवीन आशय अभिव्यक्त करण्यासाठी नेमाडे यांनी नवीन व वैशिष्ट्यपूर्ण भाषाशैलीचा अवलंब केलेला दिसतो.

रंजित देसाई यांची 'स्वामी' (१९६२) ही मराठीतील श्रेष्ठ ऐतिहासिक कादंबरी होय. 'मोचनगड' ही मराठीतील पहिली ऐतिहासिक कादंबरी मानली जाते. 'मोचनगड' नंतर शंभर वर्षांनी लिहिली गेलेली 'स्वामी' ही मात्र अस्सल व कलात्मकतेचा दर्जा प्राप्त झालेली ऐतिहासिक कादंबरी आहे. थोरले माधवराव पेशवे यांच्या जीवनावरती ही कादंबरी चित्रित झालेली आहे.

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील चि. त्र्यं. खाणोलकर यांचा विचार करावा लागतो. त्यांच्या कोंडुरा कादंबरीच्या संदर्भाने नरहर कुरुंदकर म्हणतात की, 'विश्वाचा क्रम जड भौतिक पदार्थाचे नियंत्रण करणाऱ्या नियमाच्या आधारे चालतो. तेथे संस्कृतीचे प्रश्न उपस्थितच होत नाहीत. सचेतनाच्या जीवनाचा क्रम क्षुधा, भिती व वासना या प्रेरणांच्या आधारे चालतो. तेथेही मूल्यांचे प्रश्न उपस्थित होत नाहीत. ते उपस्थित होतात माणसाच्या जीवनात, पण मानवी जीवन हाही विफल झालेल्या वासनांचा गुंताच असेल आणि त्याला शोभीवंत करण्याची व्यर्थ धडपड इतकाच संस्कृतीचा आणि मूल्यांचा अर्थ असेल. तर मग सगळच अप्रस्तुत होत नाही काय? असा तो प्रश्न आहे. आणि हा प्रश्न जेथे विकृतीचे चित्रण आहे म्हणून डावलता येणार नाही. 'रात्र काळी घागर काळी', 'अजगर' या कादंबऱ्यांत हा प्रश्न डावलता येतो. या एका गुंतागुंतीच्या अस्वस्थ करणाऱ्या पण तितक्याच वास्तविक असणाऱ्या प्रश्नाने कोंडूरा कादंबरीत व्यक्त झालेला अनुभव भरलेला आहे.'[३] मराठी कादंबरीला विकसित व समृद्ध करण्यात त्यांचा सहभाग मोठा आहे. 'मर्मभेद', 'काळोखांचे अंग', 'आनंदी गोपाळ', 'दुर्दम्य', 'सात सख त्रेचाळीस', 'इंधन', 'संजिवनी', 'माणूस', 'धाकटे आकाश', 'रथचक्र', 'पडघवल', 'बॅरिस्टर अनिरुद्ध धोपेश्वरकर', 'काळा समुद्र', 'घर गंगेच्या काठी', 'झेप', 'यंत्रावेगळा', 'ययाती', 'देवाचा शब्द', 'मृत्यूंजय' अशा कितीतरी मौलिक कादंबऱ्या स्वातंत्र्योत्तर कालखंडात लिहिल्या गेल्या आहेत.



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Ta.Mukhed.Dist.Nanded

ए. वी. जोशी यांची 'काळोखाचे अंग' ही महत्त्वपूर्ण कादंबरी होती. 'मुंबई दिनांक', 'कामायनी' आणि 'सिंहासन' या अरुण साधुंच्या राजकीय कादंबऱ्या म्हणजे मराठी कादंबरीत मोलाची भर घालणाऱ्या आहेत.

**समारोप**

शरदचंद्र मुक्तीबोध समकालिन कादंबरीचा विचार करताना १९५० ते १९७५ पर्यंतच्या मराठी कादंबरीचा अत्यंत थोडक्यात असा हा परामर्श घेतला आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी कादंबरीने जीवनाच्या अनेक क्षेत्रांना स्पर्श केलेला दिसतो. या कादंबरीनं रंजनापासून पूर्णपणे फारकत घेतलेली आहे असे वाटत नाही. मात्र स्वातंत्र्यपूर्व काळातील मराठी कादंबरीपेक्षा स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी कादंबरी पुष्पक प्रमाणात विकसित झालेली दिसते. तिने केवळ मध्यमवर्गीयांच्याच जाणिवा व्यक्त केल्या असे नव्हे तर समाजातील अनेक वर्ग, अनेक स्तर सामावून घेण्याची क्षमता तिच्या ठिकाणी निर्माण झालेली दिसते.

एकंदरीत स्वातंत्र्योत्तर काळातील कादंबरी जीवनाच्या विविध क्षेत्रांना आवकाळणारी व कलात्मकतेच्या पातळीवर जाण्यासाठी धडपड करणारी आहे, असे जाणवते. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील एक श्रेष्ठ कादंबरीकार म्हणून शरदचंद्र मुक्तीबोधाचे वाङ्मय व्यक्तीमत्त्व आपल्या लक्षात येते. त्यांच्या कादंबरीतून सकलात्मक मनुष्यतेचे दर्शन घडते. आपल्या साहित्य विचारातून त्यांनी मांडलेला सकलात्मक मनुष्यतेचा सिद्धांत आणि त्यांच्या कादंबरीतून प्रकट झालेले जीवनदर्शन याचे घनिष्ठ नाते आपल्याला दिसून येते. एक प्रतिभाशाली कवी आणि साहित्य, विचारवंत याच बरोबर एक समर्थ कादंबरीकार म्हणूनही मराठी साहित्यात आपल्या समकालीन साहित्यिकाबरोबरच शरदचंद्र मुक्तीबोध यांनी मोलाची भर घातलेली आहे.

**संदर्भसूची**

१. पवार गो. म., गारंबीचा बापू, प्रतिष्ठान, कादंबरी विशेषांक जानेवारी १९८१, पृ.२.

२. किंबहुणे रविंद्र, कोसला, प्रतिष्ठान, कादंबरी विशेषांक जानेवारी १९८१, पृ. ६१.

३. कुरुंदकर नरहर, धार आणि काठ, देशमुख आणि कं. पुणे, १९७१, पृ. २७४.

प्राचार्य
स्वामी विवेकानंद महाविद्यालय
मुक्रमाबाद ता.मुखेड जि नांदेड

240

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VII Issue - III July - September - 2018

English Part - IV / Marathi Part - III / Hindi Part - III

## Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R), M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

VOLUME - VII, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | १९४२ चे भारत छोडो आंदोलनात मुस्लिमांचा सहभाग<br>डॉ. शेख हुसेन इमाम | १-३ |
| २ | महाराष्ट्र राज्याची शेती विकासाकडे वाटचाल<br>प्रा. डॉ. बी. एस. भालेराव | ४-८ |
| ३ | सुरक्षा परिषद: लोकशाहीकरण आणि भारताची दावेदारी<br>प्रा. एकनाथ ज्ञानदेव खरात | ९-१४ |
| ४ | १८५७ चा दक्षिण महाराष्ट्र एक दृष्टिक्षेप<br>प्रा. डॉ. वसंत श्रावण देसले | १५-२१ |
| ५ | मराठे कालीन व्यापार व उद्योगधंदे<br>प्रा. डॉ. मिलिंद दशरथराव तायडे | २२-२४ |
| ६ | डी. एस. आर. अध्यापक महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेचा अभ्यास<br>प्रा. डॉ. शेख रुकसाना अजीज<br>डॉ. कानिज फातेमा | २५-२८ |
| ७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वृत्तपत्रीय लेखनातील धर्मांतरविषयक विचार<br>प्रा. महेंद्र यादवराव घनसावंत<br>प्रा. डॉ. प्रकाश वाघमारे | २९-३२ |
| ८ | छत्रपती शिवाजी महाराज आणि परकीय सागरी सत्ता एक अवलोकन<br>प्रा. डॉ. दत्ता पिलाप्पा हिंगमिरे | ३३-३७ |
| ९ | बंधू माधव यांच्या कथेवर पडलेला आंबेडकरी विचारांचा प्रभाव<br>प्रा. डॉ. बालाजी खरावे | ३८-४३ |
| १० | सैनिकी शाळा व्यवस्थापनात येणाऱ्या समस्या व उपाय<br>दत्तात्रय महादु पठपान | ४४-४६ |
| ११ | सम्राट अशोकाचा बौध्द धर्म<br>प्रा. डॉ. राजाराम सोनवणे | ४७-४९ |
| १२ | भारतीय असंघटित क्षेत्रातील यंत्रमाग उद्योगाची वाढ आणि विकास<br>डॉ. जाधव लीली दोधा | ५०-५२ |
| १३ | वेळापूरच्या इतिहासाचे साक्षीदार<br>श्री शिवाजी हरी चौगुले<br>डॉ. विश्वास शामराव कंधारे | ५३-५८ |




PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

VOLUME - VII, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR -5.5 (www.sjifactor.com)

# ९. बंधू माधव यांच्या कथेवर पडलेला आंबेडकरी विचारांचा प्रभाव

प्रा. डॉ. बालाजी खराबे
विभागप्रमुख, मराठी विभाग, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद, जि. नांदेड.

## प्रस्तावना

जावे त्यांच्या वंशा, कायद्याचा बळी, सव्वा रुपया कप, दुरून डोंगर साजरे, जन्मठेप, आम्हीही माणसं आहोत, गगनाला गवसणी, महार जन्माची चित्तरकथा इत्यादी कथा. त्यांच्या नावावरूनच दलित जीवनाची कथाकाराने स्वीकारलेली बांधिलकी व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रभावातून निर्माण झालेली कथा सूचित होते. अन्याय, रूढीविरुद्ध बंड करण्याचा प्रेरणामूल संदेश त्यांची पहिलीच 'जावे त्यांच्या वंशा' ही कथा देते. अस्पृश्यता हृदयपरिवर्तन झाल्याशिवाय केवळ कायद्याने नष्ट होणार नाही ती कागदावरच राहते. मंदिर प्रवेशाचा कायदा होऊनही अस्पृश्यांना कायदा नाही. अस्पृश्यतेला त्यांना बळी जावेच लागते. हे सत्य 'कायद्याचा बळी'मध्ये सांगितले आहे. सामाजिक जीवनात दलितांची अवहेलना व अपमान कसा केला जातो हे 'सव्वा रुपया कप' या कथेत त्यांनी परिणामकारकपणे सांगितले आहे.

## आंबेडकरी विचारांचा प्रभाव

मुरळीच्या जीवनावर चितारलेल्या 'जन्मठेप' या कथेमधील तात्या मांग विचारतो, 'कुणाला ही हुंगायला मिळाले म्हणून देवधर्माच्या नावावर देवाला वाहिलेली मुरळी. ब्राह्मणही त्याच धर्माचे. मग त्यांच्या पोरी मुरळ्या का होत नाहीत?'[१] असा जळजळीत सवाल करून सामाजिक अन्याय व सामाजिक विषमतेविरुद्ध बंधूमाधव यांनी विद्रोह पुकारलेला आहे. रूढीभंजन केले आहे. 'दुरून डोंगर साजरे'मध्ये दलितांत जागृती करून सामाजिक कार्याचा डोंगर त्यांनी वाहावा आणि हक्कासाठी झगडावे हा संदेश बंधूमाधव देतात.

'गगनाला गवसणी' या कथेत विद्रोह कसा टोकाला पोहोचला आहे हे आपणास समजून घेता येईल. "लिंबा महार पाटलांच्या गड्याला-रावजी नानाला आपण मेलेली ढोरं ओढायला येणार नाही, असे ठणकावून सांगतो तेव्हा रावजी नाना चकित होऊन विचारतो, ढोरं तुम्ही ओढायची नाही तर कुणी? ज्यांची त्यांनी ! त्याच्या शेजारपाजाऱ्यांनी जमून ते जनावर उचलून गावाबाहेर स्वतःच नेऊन टाकावं, चामडं काढावं, नाही तर कुत्र्याला घालावं. रावजी पवित्रा बदलून समजावणीच्या सुरात म्हणतो, देवानंच महाराच्या जन्माला घातलं तुम्हाला, म्हणून तुमच्या नशिबी आलेलं काम तुम्ही बिनदिक्कत करायला हवं. देवधर्म सोडला तर पातक लागेल. यावर जागृत झालेला स्वाभिमानी लिंबा सरळच सांगतो,

'देव कशाला कळतो या माणसाला. महार, मांग नि बामण ? तुम्हासारख्या सारा माणसांनीच केलंय माणसाला महार, मांग नि बामण, महार! आईच्या पोटातनं पडताना माणूस काय चिठ्ठी घेऊन येतोय व्हय की मी मांग, महार नि बामण, मराठा! त्यांच्या कपाळावर तुम्हीच लावता चिठ्ठ्या तशा. त्यावर मग घालायची देवाधर्माच्या शिक्क्याची झालर,'[२] असे



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

परखडपणे लिंबा सांगतो. पण गावकरी त्याची मग नाकेबंदी करतात. हे भयमुक्त लिंबा महाराचे चित्रण म्हणजे विद्रोहाचे जळजळीत आविष्करण आहे. आजच्या विद्रोही दलित कथेला एखाद्या वेळी मागे टाकील असा या कथेतला विद्रोह त्यावेळच्या धर्मांधतेच्या काळ वस्तुस्थितीला धरून म्हणून स्वाभाविक वाटतो. त्यात कुठलाही प्रचार येत नाही.

'आम्हीही माणसं आहोत'[3] या कथेमध्ये विद्रोहभावनेचे असे ज्वलंत प्रत्यंतर येते. गावातून महारांची वरात घोड्यावरून काढली जाते. ते उदम्यांना सहन होत नाही. त्यांचा जळफळाट होतो आणि ते वरात उद्ध्वस्त करतात. मारतात. त्यावर न्याय देणारा पाटील म्हणतो, त्यांनी नुसतं लाथाबुक्क्यांनीच बदडून काढलं. नशीब चांगलं, मुडदं पडलं नाही ते. लग्नवरात कधी तुमच्या मागे-पुढे वाडवडिलांनी काढली होती गावातून? पडीत जमीन कसाया सरकारनं दिली म्हणून आभाळाला लागले समजू नका! या पाटलाच्या या उद्दामपणामुळे मेघाकाका आवेशात येऊन चवताळून म्हणतो, 'मारा...मारा.. आमच्यावर अनंत अन्याय, जुलूम, जबरदस्ती करा; पण अशा जुलूम जाचानं आम्ही डरणार नाही, हटणार नाही, आम्हीही माणसं आहोत, आम्हालाही माणुसकीचं जिणं जगायचा हक्क आहे, त्यासाठी लढा द्यायला आम्हीही तयार आहोत!'

'महारजन्माची चित्तरकथा'[4] या कथेमध्ये यलाबाई व 'बैत्याचा बैल' मधील विठू महाराची बायको या महारकीविरुद्ध नकार-विद्रोहाची भावना व्यक्त करणाऱ्या बाणेदार दलित स्त्रिया रंगविल्या आहेत. दलित जीवनातील दुःख, दारिद्र्य, वाताहत व मृत्यू यांचे चित्रण करणाऱ्या अत्यंत हृदयद्रावक कथा बंधूमाधव यांनी लिहिल्या आहेत. गावकीच्या कामानं हैराण झालेला, कुटुंबावर सतत चिडणारा, घाण्याला जुंपलेल्या बैलासारखा राब राब राबणारा, बलुतेदार म्हणून करावे लागणारे कष्ट आणि कष्टाचा मोबदला मात्र मिळत नाही. त्यामुळे आतल्या आत कुढणाऱ्या एका दादू महाराच्या जीवनाचे प्रभावी चित्रण महारजन्माची चित्तरकथा या कथेत बंधूमाधव यांनी रेखाटले आहे.

दादू महार बलुतेदार म्हणून गावकीचं काम उपसत असतो, पण त्याच्या कामाचा मोबदला मात्र त्याला कुणीही देत नाही. रखत सदगुंड पाटील याचे धान्याचे पेव खोलायला जातो. तिथे बेशुद्ध पडतो. हे काम करूनही पाटील या कामाचं पायली - दोन पायली धान्य देईल या आशेनं तो काम करतो. संध्याकाळी घरी परत येतो आणि दिवसभराच्या कामाची मजुरी म्हणून पाटील त्याला शिळं टुकडं देतं. मुलांनी 'मला खायाला नाही आणलं बाबा?' असं विचारताच मुलांना जवळ घेतो. म्हणतो, 'महादेव, महार दिवसभर नि रातभर जरी मरमरेतोवर राबला तरी त्याला मजुरी ही शिळं टुकडं. कुत्रं, मांजर, जनावर नव्हं नि महार-मांग माणूस नव्हं ही म्हण केली या कशापायी! त्याच्या या उद्गारावरून महारजन्माची वेदना जशी स्पष्ट होते तशीच दलितांच्या दारिद्र्याचीही कल्पना येते. हक्काचा बैतदार म्हणून पाडव्याचा सण मागायला दादू महार जातो. तिथंही कुणीतरी शिळी आमटी-भात घेऊन येत असे. नाही तर एखादा खविस रखत तडातडा बोले, 'अरं डोळं फुटलं काय दादू तुझं, दिसाकडं बघून जरा बोल. आरं, आभाळातनं नाय पडली सारी, शेतकऱ्याची नाय गेली रानात कुरी नि महारा लाजामुंड्या तू पोळ्या वाढ म्हणतूस तरी कसा!'[5] अशी ही दलितांना पदोपदी खावी लागणारी बोलणी, अपमान याचे प्रभावी चित्रण दादू महाराच्या रूपाने येते.

दादू महाराचा मुलगा जेव्हा महारजन्माचे शिलकथा असणारं गाणं म्हणतो तेव्हा दादू गहिवरून म्हणतो, 'आमचं हे महारकीचं गाणं आम्हाला हे बादशहानं दिलंय म्हणं. वतनदार महार म्हणं. आम्ही लय मोठं नाव, पण त्या वतनदार महाराचा जन्म म्हणजे जन्मठेपेच्या कैद्यावानी हाय. त्या कैद्याला जसे ते कैदखाना सोडून बाहेर पडता येत नाय तसंच महार वतनाचं. लुंगुटीएवढं होतं. त्यासाठी महाराचं घरदार संकल्प, रातदुपार राबत राहायचं. रयताच्या तालावर आणि पाटलाच्या बोलावर. मजुरी ही शिळं टुकडं सात घरं मागून खा हे दादूचे महार वतनासंबंधीचे व महार जन्मासंबंधीचे विचार हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार वाटतात. कारण बंधुमाधव समजून उमजून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रभावाचा, विचारांचा संदेश आपल्या कथेतून देत असतात. दादूच्या मुलाच्या बोलण्यावरून त्याचा मुलगा यावर म्हणतो, 'म्हणून बाबा, आपले बाबासाहेब आंबेडकर हेच सांगतात, तुम्ही स्वाभिमानाने जगा, माणूस म्हणून जगा.'[६]

अखेर दादू महार गावकरी आपल्याला कामाचा योग्य मोबदला देत नाहीत आणि सहनशीलतेची परिसीमा झाल्यावर सदगुंड पाटलांचा निरोप घेऊन आलेल्या अप्पा कोळ्याला म्हणतो, जावा अप्पा, सांगा तुमच्या सदगुंड पाटलांना. म्हणावं, तुमचा महार दोन दिस उपाशी हाय, पोटात अन्न नाय म्हणून त्याला उठता येत नाही की बसता येत नाही. काम मग कसं करणार! पाहिजे तर आधी पाठवून द्या आधी भाकरी, आमटी इकडं. मी आधी पोटभर खातो नि मग नंतर येतो तुमच्या कामाला.

दादूची बायको मात्र स्वाभिमानी आहे. ती महारकीच्या वतनाला व जल्माला सतत शिव्या देते. वतन देणाऱ्या रयतालाही ती शिव्या देते. रयताविषयीची तिची प्रतिक्रिया पाहण्यासारखी आहे. ती म्हणते, 'कधी नसत्यात ही माणसं हैवान, ही रयताची, पाटलाची कुणबाड्याची जातच मेली हैवानाची, सैतानाची. फुकट काम करून घेतील, पोटाला मागितलं की यांचं आईबाप मरतील,' असा हा तिचा जातीय द्वेष ती प्रकट करते. महार वतनासाठी झिजणारा दादू व त्याची स्वाभिमानी पत्नी सखाबाई यांचे प्रभावी चित्रण बंधुमाधव यांनी रेखाटलेले आहे.

'कपाळी लिव्हल्याल कंदी पुसलं'[७] या कथेमध्ये महादेवाची आई महादेवाला सांगते, 'महादेवा, बाबा तू असं रडू नगंस रे! आता बैत्याचा बैल म्हणून तू जगू नगंस... लिव्हणं शीक... आंबेडकरावानी मोठा हो आन् धडक दे मग जोरानं या जुल्मी वतनावर.' तेव्हा आई माझे डोळे पदरीने मला कवळीत म्हणाली, 'महादेवा बाबा तू कधीही रडू नगंस या वतनाच्या कारने तुझा आई बा रडलुया तेवढं पुरं हाय. तू आंबेडकरावानी मोठा हो आणि धडक दे मग जोराने या जुलमी वतनावर. मिंग खुपस या बलुत्याच्या अन्यायी पोटात नि काढ त्यांचं आतडी पार बाहीर, कर त्याचा लोळागोळा, चेदामेदा. त्याशिवाय हे महाराच्या कपाळी लिव्हलेलं भोग कधी पुसलंच जाणार नाहीत. या कथेमध्ये बंधुमाधव यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखं शिक्षण घेऊन अन्याय, अत्याचारावर प्रहार करायचं आणि जी महारकीची गुलामी आहे ती केवळ शिक्षणामुळेच नष्ट होऊ शकते असा संदेशही या कथेमधून दिलेला आहे.

'पेटलेले आकाश'[८] या कथेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रचार करणारे, संदेश देणारे व स्वाभाविक धडक चित्रण करणारे पात्र आहे. तसेच कलात्मकदृष्ट्या चांगल्या असलेल्या कथेतही दलित जीवनाचे चित्रण करण्यात बंधुमाधव हे



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukhed Dist. Nanded

कमी पडतात. आपले कथालेखन अन्यायाच्या विरुद्ध त्यांनी समर्पकपणे लिहिलेले आहे. या कथेतील नायकसुद्धा प्रबोधनात्मक बोलूनच जातो. माणसा माणसात देवाधर्मानं असं अंतर पाडल्यामुळेच या देशात अन्यायाचं, दुःखाचं, विषमतेचं विषारी पीक भरमसाट उगवलं आहे. ते येथील माणसाच्या रक्तारक्तात भिनून गेलं आहे. हे सारं मुळासकट उपटून निपटून टाकल्याशिवाय या देशात ऐक्य, समता, बंधुभाव व लोकशाही कदापिही वाढीस लागणार नाही. आणि वाढत चाललेलं माणसा माणसातील अंतर कमी होणार नाही अशा आशयाची कथा 'पेटलेले आकाश' या कथेतून बंधूमाधव यांनी रेखाटलेली आहे.

'पेटलेले आकाश' मध्येही गेणुबुवाचा मुलगा याचा हनुमान जयंती दिवशीचा नाना उगावकर या सुधारकी बाण्याच्या ब्राह्मणाबरोबरचा मंदिर प्रवेश प्रसंग 'अखेर जातीवर गेली' मधील डॉ. सतीश या एका ब्राह्मण तरुणाने तमाशातील मंजुळा नावाच्या अस्पृश्य तरुणीशी लग्न करणे आणि ती एकदा लग्न होऊन तमाशात नाचायला जाते तेव्हा अखेर जातीवर गेली या हलक्या जातीची म्हणून तिला सोडून दिले जाते.

'विखारी भाकरी'[९] या कथेमध्ये महार वतनाविरुद्धच्या चित्रणाला प्रचाराचे स्वरूप प्राप्त झालेले दिसून येते. या कथांतून आलेली महार वतनाविरुद्धची संघर्षाची भाषा ही प्रचारी स्वरूपाची वाटते. पात्राच्या मनातील भावना महत्त्वाची मानून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तोंडची भाषणेच पात्रामुखी घातलेली आहेत. त्यामुळेच या कथेचे स्वरूप बाबासाहेब आंबेडकरांचा विचार प्रकट करणारीच कथा बंधूमाधव यांनी लिहिली आहे.

बुधगावच्या बौद्ध झालेल्या नामदेवावर जेव्हा अन्याय होतो तेव्हा जखमी अवस्थेत पोलिसांपुढे जबानी देताना तो म्हणतो, 'तुमच्या हिंदू धर्मानंच मला मारलं. आम्हाला अस्पृश्य समजून नरकातील हीन किड्यापेक्षाही हीन समाजाची हिंदू धर्मानं शिकवण दिली नसती तर गावकऱ्याची काय बिशाद होती? आम्हाला बेवारशी जनावराप्रमाणे झोडपून काढण्याची?'[१०] दलित बौद्धांवर आजतागायत होणाऱ्या अमानुषी अन्याय-अत्याचाराचे प्रतिबिंब बंधूमाधव यांनी 'मुक्ती यही पथे' या कथेतून अत्यंत मर्मभेदक रीतीने दाखविले आहे. या कथेतील प्रसंग दीर्घकाळ स्मरणात राहावा अशी ही परिणाम करून देणारी कथा आहे.

**आंबेडकरी प्रभावातून कथालेखन**

दलितांचे व्यथा, वेदनामय दाहक जीवन आविष्कृत करणाऱ्या आणि दुःखाचे कढत पाझर कडकडणाऱ्या विद्रोहासह व्यक्त करणाऱ्या अनेक कथा बंधूमाधवांनी लिहिल्या आहेत. त्यांच्या या सर्वच कथा अंतरंगात धगधगत्या विद्रोहाला प्रेरक वातावरण व वस्तुस्थिती घेऊन येताना दिसतात. ही कोणत्या पापाची शिक्षा, तो दिवस कधी उगवल, माणुसकी कोळून प्याली, कडकाव तुझा डफ अशा वेधक व बोलकी शीर्षके असलेल्या कथाही त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रभावातून लिहिलेल्या आहेत.

बंधूमाधवांच्या कथा म्हणजे पुढच्या विद्रोही दलित कथेची नांदीच आहे. सुमारे २५ वर्षापूर्वी लिहिलेल्या या कथा 'शतकानुशतके उकिरड्यावर टाकून दिलेल्या माणसाचे तुच्छ जीवन जगणारा दलित, त्याची व्यथा-वेदना, विखार व विद्रोह या सर्व भावनांना बंधूमाधवांच्या या कथांनी वाचा फोडली. ज्या काळात ती लिहिली गेली, त्याच्या संस्कारातून ती सुटू शकली

नाही. ही कथा संदेशपर आहे. कित्येकदा तो संदेश प्रचारकी थाटाचा वाटतो. आकलनात्मक रीतीनेही व्यक्त होतो. कुठे कुठे तो उघड उघड व भडक असतो तरी त्याचा स्पर्श थेट हृदयाला भिडणारा आहे. त्यांच्या या सामर्थ्यामुळेच महाराष्ट्राचे 'मॅक्झिम गॉर्की' म्हणून बंधूमाधवांचे नाव गाजले व त्यांच्या कथेने मोठ्या अपेक्षा निर्माण केल्या.'[११] पण पुढे बंधूमाधवांनी आपल्या कथालेखनाला विराम दिल्यामुळे ती अपेक्षा कथेतील प्राप्त सामर्थ्यावरच वाचकांना संतुष्ट ठेवावी लागली. एवढे मात्र खरे की त्यांची कथा संपूर्ण अंतर्धर्माने दलित जीवनाची कथा आहे. ती ज्वलंत मायबोली भाषा घेऊन आविष्कृत झाली आहे. अधिकच प्रखर आहे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची तेजस्विता त्यांच्या कथेत आहे.

**आंबेडकरांच्या विचारांचे समाजपरिवर्तन**

सामाजिक गुलामगिरी झुगारून देणारी ही भाषा माणुसकीच्या लढ्याने शिकविली होती. माणुसकीच्या लढ्याने माणसे निर्भय होतात. बंधूमाधवांच्या कथेबद्दल प्रा. गंगाधर पानतावणे लिहितात, 'बंधूमाधवांनी या देशातील वर्णवादाचे नागडे स्वरूप आपल्या कथांतून मांडले. सामाजिक आंदोलनाने तेजस्वी झालेल्या माणसाच्या व्यथा-मनोगतांना अक्षरबद्ध केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उग्र लढ्यातून आकार घेऊ पाहणाऱ्यांच्या मनाचा वेध घेतला. समर्थपणे, समृद्धपणे त्यांच्या जिवंत लेखणीने दलितांच्या वेदना मुखर झाल्या. आत कुढणाऱ्या कित्येक शतकांच्या अबोलीला बोली फुटली. बंधूमाधवांच्या या सशक्त लेखणीनेच पुढील कित्येक तरुण दलित लेखकांना प्रेरणा दिली यात शंका नाही.'[१२] अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे संदेशाद्वारे समाजपरिवर्तन बंधूमाधव यांनी घडविले होते. न्यायासाठी झगडत झगडत गगनाला गवसणी घालण्याची जिद्द, प्रेरणा सुशिक्षित तरुणामध्ये कशी येते ते बंधूमाधव यांनी दाखविले आहे. दलितांना आपल्या हक्काची जाणीव झाली आहे, आपले हक्क ते स्वत: घेऊ पाहत आहेत. एवढेच नव्हे तर लोक करीत असलेली गावकीची कामे मुळीच करावयाची नाहीत असा परिवर्तनवादी विचार लेखकांनी आपल्या कथेतून व्यक्त केलेला आहे. 'आईच्या पोटातनं पडताना माणूस काय चिठ्ठी घेऊन येईल व्हय?' अशा पद्धतीचा जळजळीत संवाद ते आपल्या कथेच्या माध्यमातून व्यवस्थेला विचारतात. यातून जातीयता ही मानवनिर्मित आहे हे बंधूमाधव आपल्या कथांमधून पटवून देतात. बंधूमाधवांच्या कथेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जागृतीचा आदर आढळतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा आणि आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनी सर्वच कथा लिहिलेल्या आहेत, असे आढळून येते.

**समारोप**

बंधूमाधवांना समाजपरिवर्तन अभिप्रेत होते. या समाजपरिवर्तनाच्या भूमिकेतूनच अस्पृश्य वर्गाच्या सामूहिक भावनांचा, इच्छा-आकांक्षांचा पहिला परिणामकारक आविष्कार करणाऱ्या त्यांच्या कथा ठरतात. त्यामुळे त्यांची कथा अधिक समाजाभिमुख दलित जीवनाची आंतरव्यथा- वेदना टिपणारी, त्यांना वेध घेणारी आणि अन्यायाविरुद्ध संतापाची आणि प्रतिकाराची भाषा बोलणारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा संदेश देणारी प्रभावी अशी कथा आहे. दलित जीवनातील विशिष्ट प्रकारच्या सामाजिकतेचे चित्रण बंधूमाधव यांनी आपल्या कथेमध्ये व्यक्त केले आहे. बंधूमाधव हे प्रभावी कथाकार, कथालेखक असूनही दीर्घकाळ उपेक्षित राहण्याचे कारण त्यांची काहीशी प्रसिद्धी न झाल्यामुळे बंधूमाधव हे विनम्र वृत्तीच्या स्वभावाचे



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Ta.Mukhed.Dist.Nanded

आल्यामुळे त्याला हे पद मरण आधू शकते. पीडितीला कोणताही विशिष्ट भविष्य न सेवा ते साहित्याकडे पाहतात. त्यांची ही धोंजाळ वृत्ती त्यांच्या लेखनाप्रमाणे त्यांच्या बोलण्याचालण्यातही आढळून येते.

संदर्भसूची

१. बंधूमाधव, अन्नदेव, अस्मितादर्श, औरंगाबाद, जानेवारी फेब्रुवारी मार्च १९८०, पृ. ८१
२. बंधूमाधव, मणकाला मनवाणी, अस्मितादर्श, उपरोक्त, पृ. ४१
३. बंधूमाधव, आम्हीही माणसं आहोत, विद्रोहाचे पाणी पेटले आहे, संपा. गंगाधर पानतावणे, पृ. १६८
४. बंधूमाधव, महार जनाची विनवणी, प्रबुद्ध भारत, २१ सप्टेंबर १९५७
५. तत्रैव
६. तत्रैव
७. पानतावणे गंगाधर, मळते चंद्रकुमार, दलित कथा, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८१, पृ. ८
८. बंधूमाधव, पेटलेले आकाश, प्रबुद्ध भारत, १८ जानेवारी १९५८
९. बंधूमाधव, पेटलेले आकाश, प्रबुद्ध भारत, ९ नोव्हेंबर १९५७
१०. पानतावणे गंगाधर, विद्रोहाचे पाणी पेटले आहे, पृ. १५१
११. मेश्राम योगेंद्र, दलित साहित्य : उद्गम आणि विकास, श्री मंगेश प्रकाशन नागपूर, १९९८, पृ.१८७
१२. पानतावणे गंगाधर, विद्रोहाचे पाणी पेटले आहे, पृ. १५२

प्राचार्य
स्वामी विवेकानंद महाविद्यालय
मुकरमाबाद ता.मुखेड जि.नांदेड

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक संशोधन पत्रिका

# विद्यावार्ता

April To June 2018
Issue-24, Vol-01

**Date of Publication
15 April 2018**

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहुभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: Harshwardhan Publication Pvt.Ltd. Published by Ghodke Archana Rajendra & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor Dr. Gholap Bapu Ganpat.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq Dist Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell 07588057695 09850203295

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

14) ROLE OF GOODS AND SERVICES TAX (GST) ON INDIAN ECONOMY
Dr. Mukesh Kumar Singh || 68

15) REQUIRED LIBRARY CONSOLES, GOALS AND BENEFITS.
SRAVANI A || 73

16) Discovering the Power of Thoughts in Light of Pt. .....
Tanushree, Dr. Indrani Trivedi || 77

17) PARENTAL INCOME DECIDES THE DEVEOPMENT OF WARD......
Dr. Sarita S. Udapurkar || 85

18) भारतीय अर्थव्यवस्थेची मजबुतीच्या दिशेने वाटचाल
डॉ. राजेश गंगाधरराव उंबरकर || 90

19) सामाजिक संशोधनातील नमुना निवडीचे तंत्र
प्रा. डॉ. सकनुरे सूर्यकांत लक्ष्मण || 92

20) उदगीर तालुक्यातील पशुकेंद्रीकरणाचा भौगोलिक अभ्यास
डॉ.आर.एस. धनुश्वर, सुरेखा बाबुराव खडके || 96

21) "पाऊस पाणी" काव्य संग्रहातील पाऊस आणि तरुण पोरी यातील शृंगारीक नाते
सोनम प्र. सुर्य || 99

"राष्ट्रवादाचा अर्थ आणि भारतीय राष्ट्रवादाच्या उदयाची कारणे"
बी. डी. तोडकर || 101

ॲथलेटिक्स खेळातील व्यक्तिमत्व गुणविशेषांचे अध्ययन
शरद सुर्यवंशी || 106

मध्यकालीन भोसले घराण्यातील कर्तबगार स्त्री राजमाता जिजाबाई
गजानन लिंबाराव सोळणर || 111

'...र ज्युबिली' वागमती नगरपरिषदेचा मानबिंदू
... सुखदेव लोखंडे. || 115

...कुमार के मन्ना में सामाजिक, सांस्कृतिक चेतना
... उपाध्याय

संदर्भ :

१. दत्त सुंदरम - भारतीय अर्थव्यवस्था
२. वार्षिक रिपोर्ट २०१७-२०१८
३. दैनिक लोकसत्ता
४. दैनिक सकाळ
५. दैनिक महाराष्ट्र टाईम्स
६. Wikipedia
७. Economics Times
८. www.Biasness India

□□□

19

# सामाजिक संशोधनातील नमुना निवडीचे तंत्र

प्रा.डॉ.सकनुरे सूर्यकांत लक्ष्मण
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
स्वामी विवेकानंद महाविद्यालय,
मुक्रमाबाद ता.मुखेड जि.नांदेड

***********

**प्रस्तावना :**

अगदी प्राचीन काळापासून सामाजिक संशोधनास सुरूवात झाली. मानव जेव्हा निसर्गावस्थेत राहत होता तेव्हा सुद्धा त्याच्या डोक्यात अनेक कल्पना येत होत्या. त्यातूनच पुढे तो वाटचाल करत आला आहे आणि आज विज्ञानयुगातील मानव अनेक क्षेत्रात संशोधन करून आपली व समाजाची प्रगती साधत आहे. समाज जीवनातील सातत्य आणि त्यात घडून येणाऱ्या संरचनात्मक परिवर्तनाची प्रक्रिया हा समाजशास्त्राचाच नव्हे तर सर्वच सामाजिक शास्त्राचा जिव्हाळ्याचा विषय राहिला आहे. बदलते सामाजिक वास्तव व तथ्यांना अनुसरून संशोधन कार्य घडून आल्यास शास्त्रीय विश्लेषणात जिवंतपणा येतो. आज आपल्यासमोर कोणत्या प्रश्न, समस्या आहेत व त्या कशा पद्धतीने सोडवता येईल याविषयी समाजसुधारक, विचारवंत सतत त्या प्रश्नांच्या मुळाशी जाऊन त्यातून समाजाला अलगदपणे बाहेर काढण्याचा प्रयत्न करतो व त्यास यश सुध्दा मिळते हेच त्याच्या सामाजिक संशोधनाचे फलीत असते. म्हणूनच संशोधन पद्धतीला नैसर्गिक शास्त्रे व सामाजिक शास्त्रात विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. सामाजिक संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. सामाजिक संशोधनात प्राचीन काळापासूनच नमुना निवड पद्धतीचा उपयोग केला जात आहे. सन 1754 मध्ये इंग्लंडच्या जनगणनेत नमुना निवड पद्धतीचा उपयोग करण्यात आला होता असे एका लेखावरून आढळून आले.

**सामाजिक संशोधनाच्या व्याख्या :**

ज्ञानाच्या शाखेतील बदलाबरोबर संशोधनाचे स्वरूपही बदलते. मात्र प्रत्येक क्षेत्रातील संशोधनाचे स्वरूप जरी भिन्न असले तरी त्यामागील वृत्ती वा भूमिका ही समान आहे. वेबस्टरच्या कोशात

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyala
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nand

[illegible] critical inquiry or examination in seeking [illegible] of principles, diligent investigation in order [illegible] ascertaining something अशी व्याख्या करण्यात आली. [illegible] मधील रिसर्चची व्याख्या अशी आहे - Studious inquiry usually critical and exhaustive investigation or experimentation having for its aim, the revision of accepted conclusions in the light of newly discovered facts.

संशोधन म्हणजे नवीन ज्ञान किंवा मिळविणे. तसेच एखाद्या [illegible] सापेक्ष माहिती गोळा करण्यासाठी जी पद्धतशीर व शास्त्रशुद्ध [illegible], अन्वेषण, शोध घेतला जातो त्याला संशोधन असे म्हटले जाते.

नवीन ज्ञान प्राप्त करण्यासाठी केलेल्या पद्धतशीर प्रयत्नांना संशोधन असे म्हणतात. कोणत्याही सामाजिक समस्येच्या सोडवणुकीसाठी [illegible] पद्धतशीर आणि शास्त्रीय चिंतन म्हणजे संशोधन होय.

सामाजिक तथ्य, व्यवहार, घटना, सिद्धांत आणि नवीन [illegible] यांच्याशी संबंधित असणाऱ्या सर्व प्रकारच्या संशोधनांना सामाजिक संशोधन असे म्हणतात.

सामाजिकशास्त्रे ही वैज्ञानिक शास्त्रांच्या मानाने खूप अलीकडची आहेत, ती अद्यापि शास्त्र या दृष्टीने विकास पावत आहेत. त्यांच्या विकासातही संशोधनाला फार महत्त्वाचे स्थान आहे. अलिकडे [illegible] पद्धतीचा व मार्गांचा अवलंबनाने सामाजिक क्षेत्रातील संशोधनही बरेच वस्तुनिष्ठ होत चालले आहे.

शास्त्रीय संशोधन हे कोणत्यातरी विशिष्ट अशा प्रश्नाच्या (प्रॉब्लेम) जाणिवेने सुरू होते.

मार्क्स हा सामाजिक शास्त्राचा [illegible] आहे असे [illegible] म्हणतात. मार्क्सने इतिहासादी समाजशास्त्राच्या अभ्यासाला शास्त्रवेद म्हणून वेगळीच प्रतिष्ठा प्राप्त करून दिली आहे. सामाजिक शास्त्राच्या क्षेत्रात कारणांची अनेकता ही महत्त्वाची असते. विज्ञानशास्त्राच्या क्षेत्रात ही विविधता कमी करीत करीत एका कारणापर्यंत नेता येते.

सामाजिक शास्त्राच्या क्षेत्रातील संशोधनाचे उद्दिष्ट स्पष्ट [illegible] म्हणतात, त्याप्रमाणे सामाजिक शास्त्राच्या विविध [illegible] त्यांच्या बाबतीत माहिती संकलन किंवा तथ्य शोधनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यासाठी त्या शास्त्रांनी [illegible] अशी [illegible] (टूल्स ऑफ रिसर्च) उपयोगात केली आहेत.

**नमुना निवडीच्या व्याख्या :**

गुड आणि हॅट - नमुना त्यातील नावाप्रमाणेच एका विस्तृत समूहाचा लघु प्रतिनिधी आहे.

श्रीमती यंग - एक सांख्यिकीय नमुना म्हणजे संपूर्ण समूहाच्या किंवा समग्राचा एक निवडलेला भाग होय.

फ्रँक यादव - नमुना शब्दाचा उपयोग केवळ कोणत्याही समग्राच्या एककास किंवा एका भागाकरिता केला पाहिजे. ज्या भागास या विश्वासाने निवडलेले असते की तो समग्राचे प्रतिनिधित्व करील. वरील व्याख्यावरून हे स्पष्ट होते की, विश्व किंवा समग्रातील एकूण एककांपैकी काही प्रतिनिधी एककांची निवड करणे म्हणजे नमुना निवड होय. म्हणजेच समग्राचे योग्य प्रतिनिधीत्व करणाऱ्या काही एककांना नमुना म्हणतात.

**भारतात संशोधनाचा प्रारंभ :**

आपल्या देशात आधुनिक काळात संशोधनाची पायाभरणी ब्रिटिशांनीच केलेली असावी हे क्रमप्राप्त होत. विल्यम जोन्स यांनी इ.स.1784 मध्ये एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगाल ही संस्था स्थापन केली. तिचे उद्दिष्ट आशियाचा प्राचीन इतिहास, प्राचीन अवशेष, कला, शास्त्रे व वाङ्मय इत्यादींचा अभ्यास करणे हे होते.

आशियातला हा पहिलाच संशोधनविषयक उपक्रम होय असे म्हणता येते. अशाच प्रकारचा उपक्रम सर जेम्स मॅकिंटॉश यांनी महाराष्ट्रात केली. त्यांनी इ.स.1804 मध्ये एशियाटिक सोसायटी ऑफ बॉम्बेही ही संस्था वरील संस्थेच्या धर्तीवरच काढली व महाराष्ट्रात आधुनिक ज्ञानोपासनेची मुहूर्तमेढ रोवली.

स्वत:च्या साम्राज्यवादी धोरणाबद्दल व करड़ेपणाबद्दल ख्यात असलेल्या आणि त्यामुळेच भारतीय जनतेच्या अप्रिय झालेल्या लॉर्ड कर्झनने इ.स.1904 मध्ये भारतीय पुराणवस्तू संशोधन खाते स्थापन केले. न्यायमूर्ती रानड्यांनी प्राचीन संतांच्या कार्याचे मूल्यमापन केले व मराठी सत्तेचा उत्कर्षहा हा ग्रंथ याच दृष्टीने लिहिला. महाराष्ट्रात संशोधनास सुरूवात जरी श्री.नी.ज. कीर्तने यांच्या ग्रँड डफच्या इतिहासावरील निबंधने इ.स.1867 मध्ये झाली. तरी काव्येतिहास संग्रह हा इ.स.1878 मध्ये निघालेल्या व अकरा वर्षे चाललेल्या मासिकाने संशोधनाचे नवेच युग महाराष्ट्रात निर्माण केले. साने, खरे, पारसनीस व राजवाडे यांनी महाराष्ट्रात इतिहास संशोधकाचे नवे युग निर्माण केले आणि म्हणूनच प्रा.पोतदार यांना धर्मुन चतुष्टयड म्हणतात. कोणत्याही विषयाचे संशोधन हाती घेतान नमुना निवडीला विशेष महत्व आहे. संशोधकाला नमुना निवड (अचूक) योग्य करता आली पाहिजे तरच त्याच्या संशोधन कार्यात अडचणी निर्माण होणार नाहीत व संशोधन कार्य यशस्वी होते.

कोणत्याही समूहाशी संबंधित असलेली तथ्ये गोळा करण्याचे दोन प्रकार आहेत. पहिला म्हणजे समूहाच्या सर्व सदस्यांशी संपर्क स्थापन करून तथ्ये संकलीत करणे. दुसरा म्हणजे समूहाच्या सर्व

सदस्यांऐवजी त्यांच्यातील एक प्रतिनिधी निवडून त्याच्याशी संपर्क साधून माहिती गोळा करणे. समूहाच्या सर्व सदस्यांशी अथवा एकमेकांशी संपर्क प्रस्थापित करून माहिती गोळा करणे या पद्धतीला जनगणना पद्धती (Census Method) असे म्हणतात. पण ही जनगणना पद्धत अथवा समग्र पद्धत समूह लहान असेल तरच शक्य असते. दुसऱ्या पद्धतीत समूहाचे प्रतिनिधी सदस्य निवडून त्यांच्याकडून माहिती मिळवणे व ती माहिती संपूर्ण समूहाची अथवा समग्राचे आहे असे मानणे हया पद्धतीला नमुना निवड पद्धत (Sampling Method) असे म्हणतात. सामान्य जीवनात ह्याच पद्धतीचा वापर होतो. घशितावरून भाताची परीक्षाड घेतली जाते किंवा छोटासा नमुना निवडून त्यावरून समग्राची पारख केली जाते.

बाजारात गहू, तांदूळ किंवा इतर धान्य खरेदी करताना दुकानदार वेगवेगळ्या पोत्यातील थोडे थोडे धान्य काढून दाखवतो. ग्राहक त्याचे निरीक्षण करतो व जे धान्य आवडले असेल ते खरेदी करतो. म्हणजे पोत्यातील पूर्ण धान्य न पाहता मुठभर धान्याचे निरीक्षण करतो. आवडलेले धान्य तो मोजायला सांगतो याचाच अर्थ असा की मुठभर धान्याच्या आधारावर धान्य चांगले आहे किंवा नाही याचे तो अनुमान काढतो. शास्त्रीय भाषेत ते मुठभर धन्य म्हणजेच त्या पोत्यातील धान्याचा नमुना होय. दैनंदिन जीवनात नेहमीच नमुना निवडण्याचा उपयोग केला जातो. सारांश हा की जेव्हा संपूर्ण जनसमूहावर एखाद्या कारकाचा काय परिणाम होतो हे माहीत करून घेण्यासाठी काही प्रातिनिधिक एकक (Unit) निवडून त्या परिणामाचे मापन केले जाते तेव्हा त्याला नमुना निवड पद्धत म्हणतात.

नमुना पाहणीच्या आधारे समग्राबाबत सामान्य स्वरूपाचे निष्कर्ष काढले जातात. शास्त्रीय संशोधनात नेहमीच नमुना निवड पद्धतीचा अवलंब केला जातो. ए.एल. बाऊले हे सामाजिक शास्त्रातील शास्त्रीय नमुना पद्धतीचे जनक मानले जातात. त्यांनी 1912 ते 1913 च्या दरम्यान दांबस मानाने 20 कुटुंबामध्ये एक कुटुंब नमुना निवडून त्या नमुन्याच्या अध्ययनावरून काही निष्कर्ष काढले.10 त्यांनी हे दाखवून दिले की, नमुना पद्धतीमुळे वेळ, श्रम व पैशाची बचत होते व त्याद्वारे वस्तुनिष्ठ प्रतिनिधिक स्वरूपाचे निष्कर्ष काढले जातात.

नमुना निवडीच्या पद्धती :

(1) विविध सर्वेक्षणाचा प्रश्न सोडविणे सोपे :

अभ्यास विषय जर व्यापक असेल तर त्यात गुंतागुंती निर्माण असते व त्यामुळे माहिती जमविण्याचे काम करण्यासाठी विशेष प्रशिक्षण असणाऱ्या व्यक्तीची गरज लागते. त्यामुळे सामान्य ...

त्यामुळे सामान्य व्यक्तीची गुंतागुंतीच्या विषयांची माहिती जमा करण्यासाठी नियुक्ती करावी लागते परंतु या उलट नमुना पद्धतीचा अवलंब केला तर विषयाचे स्वरूप मर्यादित होते व त्यामुळे सामान्य व्यक्तींच्या मदतीने, काम करून घेता येणे शक्य होते. तसेच कामाचे स्वरूप सामान्य असल्यामुळे कोठलेही विशेष प्रकारचे शिक्षण देण्याची गरज भासत नाही.

(2) सविस्तर अध्ययन :

ह्या पद्धतीत फक्त मोजक्या घटकांचाच अभ्यास करावा लागतो म्हणजे घटकसंख्या कमी व मर्यादित असते. त्यामुळे त्या घटकाचे सूक्ष्म व सर्वांगीण निरीक्षण करता येते. त्यामुळे सविस्तर अभ्यास करता येतो.

(3) माहिती मिळविण्याची सुविधा :

नमुना निवडीत फक्त मर्यादित घटकांचाच अभ्यास करावयाचा असल्यामुळे विस्तृत क्षेत्रातील संशोधनापेक्षा माहिती मिळविणे सुलभ होते.

(4) वेळ, श्रम व पैसा यांची बचत :

आधुनिक काळातील समाज जीवन हे गतीशील आणि परिवर्तनशील आहे. त्यामुळे कोणतेही संशोधन कार्य हे फार मोठ्या कालावधी पर्यंत सुरू राहात असेल तर त्या संशोधन विषयाच्या समग्रातील एककात परिवर्तन होण्याची शक्यता अधिक असते. म्हणून नमुना निवड पद्धतीचा अवलंब करणे हे आवश्यक झाले आहे. नमुना निवड पद्धतीचा अवलंब केल्यामुळे संपूर्ण समग्राचे अध्ययन करण्याची आवश्यता नसते. त्यामुळे वेळ, श्रम आणि पैसा यांची बचत होते. हा नमुना निवड पद्धतीचा फार मोठा फायदा आहे.

(5) विश्वसनीय निष्कर्ष :

नमुना निवड पद्धतीत एककांची संख्या ही मर्यादीत असते. त्यामुळे नमुन्यातील एककांकडून मिळालेल्या उत्तरांची अचूकता संशोधनकर्ता तपासू शकतो. याउलट जनगणना पद्धतीमध्ये एककांची संख्या ही खूप विस्तृत असते. अशा परिस्थितीत संशोधनकर्ता उत्तरदात्याकडून मिळालेल्या उत्तरांची अचूकता तपासून बघू शकत नाही. म्हणून जनगणना पद्धतीच्या तुलनेत नमुना निवड पद्धतीद्वारे निवडलेली तथ्ये ही अधिक विश्वसनीय असतात. आणि विश्वसनीय तथ्यांच्या आधारावर काढलेले निष्कर्ष देखील विश्वसनीयच राहणार.

(6) सुलभ प्रशासन :

नमुना निवड पद्धतीत संपूर्ण एककाचे अध्ययन करण्याची

एकाकडेच सर्वांना बोलावून निरीक्षण करणे कठीण जात नाही. आणि प्रकारे उत्तरदात्यांशी संपर्क साधणे, त्यांचे संकलन करणे इत्यादी गोष्टी करणे संशोधकासाठी सुलभ जाते.

(७) घटकांशी सुसंवाद :

कोणत्याही प्रकारच्या विषयाच्या संशोधनाचे यश हे संशोधक व निवेदक यांच्या सुसंवादावर अवलंबून असते. संशोधक जर चतुर व बुद्धिमान असेल तर निवेदकाशी बोलके करून अपेक्षित माहिती संकलित करीत असतो. प्रत्येक घटकाशी संबंध निर्माण होत असल्यामुळे संपर्क सहज होऊन वास्तविक माहिती संशोधकाच्या हाती लागत असते.

(८) एकाच वेळी अनेक समस्यांचे अध्ययन :

कोणताही समाज समस्यांविना मुक्त नसतो. अनेक प्रकारच्या समस्यांशी तुलना सुखाकूळ झालेला असतो. नमुना पद्धतीत निवडक निवेदकाच्या या घटकाच्या सहाय्याने समाजातील विविध प्रकारच्या समस्यांचा अभ्यास उत्तम रीतीने करण्याचे एकमेव माध्यम वा तंत्र जर कोणते असेल तर नमुना निवड पद्धत होय.

सारांश :

अशा प्रकारे वरील फायदे नमुना निवडल्यामुळे होतात. त्यामुळे नमुना निवडीला संशोधनात विशेष महत्त्व आले आहे. ही नमुना पद्धत सामाजिकशास्त्रात फार लोकप्रिय ठरली आहे. कारण ह्या पद्धतीत वेळ, पैसा, श्रम व साधने ह्या संबंधीच्या समस्या दूर होतात. तरीही नमुना निवडीचे फार काळजी घ्यावी लागते. आपल्या देशात नॅशनल सॅम्पल सर्वे या संस्थेच्या अंतर्गत इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट कलकत्ता, गोखले इन्स्टिट्यूट ऑफ इकॉनॉमिक्स एण्ड पोलिटिक्स, पुणे या संस्थांतर्फे नमुना पद्धतीचा अवलंब करून सामाजिक सर्वेक्षण केले. आज नमुना निवड तंत्र हे सामाजिक संशोधनाचे एक लोकप्रिय साधन ठरले आहे.

संदर्भ :

1) डॉ. दु. का. संत : संशोधन पद्धती, प्रक्रिया व अंतरंग, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे, पृ.क्र.9

2) उपरोक्त, पृ.क्र.9

3) डॉ. सोमनाथ रोडे : संशोधन करताना, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती 2008, पृ.क्र.5

4) डॉ. दु. का. संत : संशोधन पद्धती, प्रक्रिया व अंतरंग, विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे, पृ.क्र.29

5) प्रा.रा.ना. घाटोळे : समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे व पद्धती, पृ.क्र.160

6) उपरोक्त पृ.क्र.160

व तंत्रे, पृ.क्र.171

8) उपरोक्त पृ.क्र.3

9) प्रा.रा.ना. घाटोळे : समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे व पद्धती, उपरोक्त, पृ.क्र.160

10) डॉ. प्रदीप आगलावे : सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, उपरोक्त पृ.क्र.171

□□□

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - II April - June - 2019

Marathi Part - II

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | न्याय संवल्पनेतील भारत<br>**डॉ. अरविंद सोगनाथे** | ७३-८१ |
| १४ | मानवी अधिकाराचे उलंघन एक अध्ययन<br>**डॉ. संजय साळीवकर** | ८२-८६ |
| १५ | वृत्तपत्राचे प्रथम पृष्ठ व त्यावरीलमथळ्यातून प्रदर्शित होणारी वैचारिक भूमिका<br>**नागेश नामदेव सोनोने** | ८७-८९ |
| १६ | महाराष्ट्रातील आदिवासींच्या विकासात शासकीय आदिवासी आश्रम शाळांचे योगदान<br>**नाईक कैलास श्रीरंग** | ९०-९४ |
| १७ | मिलिंद प्रश्न : गहन प्रश्नांची सहज सुंदर उकल<br>**डॉ. प्रा.राजश्री पवार** | ९५-९७ |
| १८ | 'भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे' या संग्रहातील काही वैशिष्ट्यपूर्ण देवता व अवतार चित्रे<br>**सौ. अंजली भामरे**<br>**डॉ. श्रीकांत प्रधान** | ९८-१०२ |
| १९ | समकालीन आदिवासी भिल्ल चळवळीचा इतिहास<br>**प्रा. योगीता महादेव गावंडे** | १०३-१०६ |
| २० | खानदेशातील लोककथा एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. संगिता शेळके .** | १०७-१०९ |
| २१ | भारतातील मनुष्यबळ : एक चिकीत्सक अभ्यास<br>**डॉ. पंडित शेषराव नलावडे** | ११०-११७ |
| २२ | पत्रकार डॉ. भीमराव रामजी आंबेडकर<br>**ऋषिकेश रमेश आढाव** | ११८-१२३ |
| २३ | राजकीय नेतृत्वाचा अभ्यास<br>**डॉ. संभाजी संतोष पाटील** | १२४-१३३ |
| २४ | भौगोलिक परिस्थिती व पर्यावरणाचा ऱ्हास<br>**प्रा. नारायण पांचाळ** | १३४-१३७ |




PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed Dist.Nanded

VOLUME - VIII, ISSUE - II - APRIL - JUNE - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# २४. भौगोलिक परिस्थिती व पर्यावरणाचा ऱ्हास

प्रा. नारायण पांचाळ
सहाय्यक प्राध्यापक, भूगोल विभाग, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद, जि. नांदेड.

## प्रस्तावना

पर्यावरण म्हणजे मानवाच्या सभोवतालची परिस्थिती होय. यामध्ये पृथ्वी, हवामान, वातावरण व जैवविविधता यांचा समावेश होतो. मानवाने या पर्यावरणातील नैसर्गिक साधनसामग्रीच्या सहाय्याने आर्थिक विकास साधला खरा पण नैसर्गिक साधनसामग्रीच्या अतिरिक्त, अयोग्य वापरामुळे मानवाचे पर्यावरणास हानी पोहचविण्याचे प्रमाण वाढले, परिणामतः हवा प्रदूषण, जल प्रदूषण, भूमीप्रदूषण, ध्वनी प्रदूषण यांबरोबरच हवामान बदल व ग्लोबल वॉर्मिंग अशा अनेक परिणामांना सामोरे जावे लागत आहे. मानवी कृतींमुळे आज पर्यावरणाचे व पृथ्वीचे संतुलन दिवसेंदिवस बिघडत चालले आहे. त्यामुळे त्सुनामी, वादळे, अतिवृष्टी, दुष्काळ अशा अनेक समस्यांना भारतासह अनेक देशांना तोंड द्यावे लागत आहे. आज जगाने बरीच प्रगती केली असली तरी सर्व देशांना पर्यावरणाच्या हानीमुळे विकासात अडथळे निर्माण होत आहेत.

## संशोधन पद्धती

सदरचा लेख हा दुय्यम माहितीवर आधारित आहे. सदर लेखासाठी पर्यावरणावरील विविध संदर्भ पुस्तके, वर्तमानपत्रे व वेबसाईट्सचा वापर केलेला आहे. हा लेख आर्थिक विकास आणि पर्यावरण यांचा संबंध, पर्यावरणीय ऱ्हासाचे परिणाम, शाश्वत विकास व पर्यावरणविषयक सुरक्षिततेसाठी उपाययोजना या भागांमध्ये विभागून सद्यःस्थितीचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.

## अभ्यासाची उद्दिष्टे

१. पर्यावरण आणि आर्थिक विकास यातील आंतरसंबंधाचा अभ्यास करणे.
२. पर्यावरणीय ऱ्हासाच्या परिणामांचे विश्लेषण करणे.
३. भौगोलिक शाश्वत विकास संकल्पनेचा अभ्यास करणे.
४. पर्यावरण सुरक्षिततेसाठी उपाययोजना सुचवणे.

## आर्थिक विकास आणि भौगोलिक पर्यावरण

पर्यावरण आणि आर्थिक विकास यांचा आंतरसंबंध आहे. पर्यावरण (नैसर्गिक साधनसंपत्ती) हा विकासाचा प्रमुख स्रोत आहे. विकास म्हणजे वस्तू व सेवांचे उत्पादनात वाढ होणे होणे. नैसर्गिक संसाधनांच्या योग्य, पर्याप्त व कार्यक्षम वापरावर आर्थिक विकास अवलंबून असतो. केवळ नैसर्गिक संसाधनांची विपुलता असून त्यांचा वापर अयोग्य, अपूर्ण होत असेल तर परिणामतः दारिद्र्य, बेरोजगारी आणि मागासलेपणा या समस्या निर्माण होतात. या संदर्भात प्रसिद्ध नोबल पुरस्कार विजेते अमेरिकन अर्थतज्ञ गुन्नर मिर्डाल म्हणतात, 'श्रीमंत भारतामध्ये गरीब लोक राहतात.' अर्थात भारत हा नैसर्गिक संसाधनांनी विपुल देश आहे. पण अकार्यक्षम व अपूर्ण वापरामुळे येथे गरिबीचे प्रमाण अधिक आहे. आर्थिक विकासासाठी पर्यावरण आवश्यक घटक आहे. पण



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed Dist.Nanded

आर्थिक विकास मात्र पर्यावरणासाठी हानिकारक आहे. कारण अनेक पर्यावरणीय समस्या, प्रदूषण समस्या, पर्यावरणीय [illegible] नैसर्गिक संसाधनांचा अतिरिक्त वापर व ग्लोबल वार्मिंग हे विकासाचे परिणाम आहेत. मानवाने चाकाच्या शोधापासून ते आज तंत्रज्ञानाच्या शोधापर्यंत विकासाची फळे चाखली आहेत. वसुंधरेतील विविध नैसर्गिक साधनांचा वापर स्वार्थासाठी मोठ्या प्रमाणात केलेला आहे. मात्र विकासाच्या प्रवाहात मानवाला एका गोष्टीचा विसर पडला. तो म्हणजे भविष्यातील पिढीसाठी आपण या साधनसामग्रीचे संवर्धन केले पाहिजे.

**पर्यावरणीय ऱ्हासाचे भारतावरील परिणाम**

आज भारताने सेवाक्षेत्रासह उद्योग क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. मात्र त्याचबरोबर भारताची वाढती लोकसंख्या व भारतातील पर्यावरणीय ऱ्हासाची समस्या देखील तेवढ्याच वेगाने वाढत आहे. त्यामुळे भारतावर नैसर्गिक पर्यावरणीय ऱ्हासाचे गंभीर स्वरूपाचे परिणाम होत आहेत ते परिणाम पुढीलप्रमाणे -

**ग्लोबल वार्मिंग : तापमान वृद्धी**

ग्लोबल वार्मिंग म्हणजे जागतिक तापमानात झालेली वाढ होय. मानवी कृतींमुळे हवेतील कार्बनडाय ऑक्साइड (Co२), मिथेन व नायट्रस ऑक्साइड (No२) या प्रमुख हरित वायूंचे (GHG) प्रमाण वाढल्यामुळे तापमानात दिवसेंदिवस वाढ होत आ. दुसरे कारण म्हणजे ज्या काळात सूर्य स्वतःहून उष्णता जास्त बाहेर टाकतो तेव्हा निसर्गतः पृथ्वीच्या वातावरणाचं तापमान वाढतं. पृथ्वीच्या वातावरणाचा गेल्या आठ लाख वर्षांचा नेमका इतिहास शोधून काढला आहे. या संपूर्ण कालखंडात वातावरणातील कार्बन डाय ऑक्साइड, मिथेन अशा तापमान वाढवणाऱ्या वायूंचे प्रमाण प्रतिदशलक्ष घटकामध्ये (३०० पीपीएम) पेक्षा कमी होते (२८० पीपीएम). पण गेल्या २०० वर्षात म्हणजे २००१ साली या वायूंनी (३८० पीपीएम) चा टप्पा ओलांडला. ते प्रमाण आता (४०० पीपीएम) पर्यंत पोहोचले आहे. य सर्व गोष्टीद्वारे वातावरणात दरवर्षी ६.४ अब्ज टन इतका कार्बन सोडला जातो. असं इंटर गव्हर्नमेंटल पॅनेल ऑन क्लायमेट चेंज (IPCC) या जागतिक संघटनेनं जाहीर केलं आहे. जगातील सर्वाधिक तापमानाची दहा वर्षे १९९५ ते २००६ या काळात आहेत. भारतातील विविध अभ्यासांतो हे लक्षात आले आहे की, भारतातील भूपृष्ठालगतच्या हवेचे तापमान दर दशकांमागे ०.४०°C दराने वाढले आहे. विशेषतः मान्सूननंतर व हिवाळ्याच्या ऋतुत हे दिसुन आले आहे. प्रतिमानाच्या आधारे अभ्यासकांनी भाकीत केले आहे की, हरित वायूंमुळे हिवाळ्यातील सरासरी तापमान २०५० पर्यंत ३.२०°c आणि २०८० पर्यंत ४.५०°c तर उन्हाळ्यातील सरासरी तापमान २०५०:२.२०°c व २०८०:३.२०°c असे अनुक्रमे वाढेल. तापमानातील या वाढीचे सर्व सजीव सृष्टीवर विपरीत परिणाम होतील. तापमानातील वाढीमुळे हिमालयातील बर्फ वितळून उन्हाळ्यात देखील पूर परिस्थिती गंभीर प्रश्न निर्माण करत आहे. तापमान वृद्धीमुळे हिमनद्यांतील बर्फ वितळणे, नैसर्गिक तलावाच्या क्षमतेत घट होणे व उन्हाळ्यात पूर परिस्थिती निर्माण होणे हे संभाव्य परिणाम भविष्यात आणखीनच तीव्र बनतील.

**भारतीय मान्सून**

भारतीय मान्सूनच्या अनियमितेत झालेली वाढ हा पर्यावरणीय ऱ्हासाचा एक प्रमुख परिणाम आहे. भारतीय शेती मान्सून वर आधारित आहे. शिवाय पाण्याची गरज आणि जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धनासाठी मान्सून अपरिहार्य आहे. भारताच्या मान्सून पर्जन्य प्रवृतीत झालेला बदल दिल्ली IIT मधील शास्त्रज्ञांनी नोंदविला आहे. त्यांनी असा इशारा दिला आहे



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed Dist Nanded

की, भारताला २०५० पर्यंत घटत्या पर्जन्यमानाचा अनुभव येइल व कृषी क्षेत्रावर त्याचा विपरीत परिणाम होईल. आज २०१३ मध्ये महाराष्ट्राच्या बहुतांश भागात दुष्काळाने थैमान घातले आहे. पिण्यासाठी पाणी नाही, जनावरांना चारा नाही त्यामुळे आज हजारो लोक विस्थापित झाले आहेत. आज महाराष्ट्रातील मराठवाडा, विदर्भासह सांगली, सातारा, सोलापूर या जिल्ह्यांसह महाराष्ट्राचा बराचसा भाग पाऊस व पाण्याअभावि तीव्र दुष्काळात सापडलेला आहे. याचं मुख्य कारण हवामान बदलामुळे कमी झालेला पाऊस हेच आहे. भारताच्या उत्तर-पश्चिम भागात पर्यावरणीय ऱ्हासाचा व हवामान बदलाचा परिणाम शेती, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, विजनिर्मिती इ. वर झालेली आहे.

**शेती उत्पादन**

तापमान वाढीचा शेती उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होतो. तापमान उच्च पातळीवर राहिल्याने पीक चक्र बदलते. हंगामाचा कालावधी कमी होतो. त्यामुळे पिकांना लवकर फुले आल्यामुळे एकूण उत्पादनात घट होते. तापमानातील Co२ च्या वाढीमुळे अन्नधान्यातील पोषक घटक कमी होतात. तसेच पिकांची नायट्रोजन, लोह, झिंक यांचे शोषण करण्याची क्षमता कमी होते. परिणामतः पिकांमध्ये पोषणमुल्ये कमी होतात. मान्सूनच्या अनिश्चततेत झालेल्या वाढीमुळे कधी सरासरी पेक्षा जास्त तर कधी सरासरी पेक्षा कमी पाऊस पडतो आहे. गहू, द्राक्षं यासारख्या पिकांचं उत्पादन घटत आहे. ऐन पेरणीच्या वेळी शेतकऱ्याला दगा देऊन पीक कापणीच्या व मळणीच्या काळात गरज नसताना पाऊस पडतो आणि शेतकऱ्याच्या संपूर्ण पीकाचे नुकसान होऊन उत्पादकता घटत आहे. परिणामतः कृषी क्षेत्राचा वृद्धी दर घटत जाऊन शेतीचे भारताच्या GDP मधील योगदान सतत घटत आहे. एकूणच भारतीय शेती व शेतकरी यांच्यावर प्रतिकूल परिणाम होवून शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत.

**समुद्र किनारपट्टी व नद्यांची खोरे**

भारतीय समुद्र किनारपट्टी दर दशकाप्रति १ सेमी. ने वाढलेली नोंद झाली आहे. तसेच भारतीय समुद्र पातळी २०५० पर्यंत २५ ते ४० सेमी. पर्यंत वाढण्याची शक्यत तज्ञांनी व्यक्त केली आहे. याचा परिणाम म्हणजे भविष्यात किनारे कोरडी पडतील, त्रिभुज प्रदेश व सागरी बेटे यांचे अस्तित्त्व धोक्यात येइल. सागरी वनांचा ऱ्हास होईल, त्यामुळे माशांच्या जाती विरळ होऊन त्याचा विपरीत परिणाम मासेमारीवर होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर भारतातील प्रमुख नद्या गंगा व ब्रह्मपुत्रा या नद्यांची खोऱ्यातील सुपीकता व जलसंपत्तीवर मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या अवलंबून आहे. पण नजीकच्या काळातील जलप्रदुषण व तापमानातील बदलामुळे पाण्यातील क्षारांचे प्रमाण वाढून जमिनीची नापिकता वाढत जात आहे. त्याचा प्रतिकूल परिणाम या भागातील विकासावर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**पर्यावरण सुरक्षिततेसाठी शाश्वत विकासाची गरज**

भारतासारख्या विकसनशील देशांनी पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी शाश्वत विकास (Sustainable Development) संकल्पना स्विकारली पाहिजे. पर्यावरण शास्त्रज्ञांच्या मते, शाश्वत विकास म्हणजे 'वर्तमान पिढीने आपल्या गरा पूर्ण करताना नैसर्गिक साधनांचा उपभोग अशा प्रकारे घेतला पाहजे की, भविष्यातील पिढीला त्या कोणत्याही घटीशिवाय उपलब्ध होतील.' थोडक्यात आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये पर्यावरणाचा समतोल राखणे अपेक्षित आहे. म्हणजेच एक झाड तोडताना दोन झाडे लावली पाहिजेत. 'झाडे लावा झाडे जगवा', पाणी अडवा पाणी जिरवा' हे संदेश प्रत्येकाने आचरणात आणले पाहिजेत. यासाठी पर्यावरण विषयक जनजागृती वाढवणे गरजेचे आहे. खनिज संपत्ती, जलसंपत्तीमधील काही घटक आज



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Ta ...

संपण्याच्या मार्गावर आहेत तेव्हा यांचा वापर मर्यादित केला पाहिजे. म्हणजेच शाश्वत विकासाचे तत्त्व अंगिकारीत गेल्यास आणि भावी पिढी आपले सन्मानाने स्मरण करेल.

### उपाययोजना

या बरोबरच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करणे आवश्यक आहे.

- त्याबरोबर कार्बनच्या प्रमाणात घट करणे.
- हरित वायूंचे (GHC) प्रमाण कमी करणे.
- वाढत्या लोकसंख्येला आळा घालणे.
- योग्य जलव्यवस्थापन करणे.
- स्वच्छ तंत्रज्ञान व इको फ्रेंडली वस्तूंचा वापर करणे.
- पर्यावरण विकास प्रकल्पात महिलांना सहभाग वाढवणे.
- पर्यावरण संधारणात शासकीय संस्थांबरोबरच अशासकीय सेवाभावी संस्थांचा (NGOs) सहभाग वाढवणे.
- वृक्षारोपण, जलसंधारण, वन्यप्राणी संरक्षण, मृदा संधारण, हरित पट्ट्यांचा विकास, जैवविविधतेचे संरक्षण इ. उपक्रमाद्वारे पर्यावरण व्यवस्थापन व नियोजन करणे आवश्यक आहे.
- पर्यावरण विषयक कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी करणे.

### समारोप

पर्यावरणीय ऱ्हास व मानवाने केलेली प्रगती यांच अत्यंत जवळचा संबंध आहे. पर्यावरणीय ऱ्हासाचे परिणाम भारतासह सर्वच विकसित-विकसनशील राष्ट्रांना भोगावे लागत आहेत. त्यासाठी आर्थिक विकास व पर्यावरणीय धोरणे यांची सांगड घालणे आवश्यक आहे. आर्थिक विकास करत असताना पर्यावरणाची सुरक्षितता राखणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. उत्पादन व उपभोगाच्या नवीन पद्धती शोधल्या पाहिजेत जेणे करून पर्यावरणाचे प्रदूषण होणार नाही. त्यासाठी पर्यावरण विषयक जनजागृती वाढवणे गरजेचे आहे. तेव्हा मानवाने शाश्वत विकासासाठी आपल्या दैनंदिन कृतीतून पर्यावरणाला कमीत कमी हानी पोहचवून पर्यावरणाचे संतुलन राखणे आवश्यक आहे. अन्यथा भविष्यात दुष्काळ, अतिवृष्टी, भूकंप, त्सुनामी अशा विनाशकारी संकटांना तोंड द्यावे लागेल.

### संदर्भसूची

१) अभिजित घोरपडे: 'गाथा पर्यावरणाची', राजहंस प्रकाशन, पुणे (२०११).
२) डॉ. जयकुमार मगर : 'पर्यावरणशास्त्र परिचय', विद्या प्रकाशन, नागपूर.
3) Gupta Vishwajit :'Global Warming and Environment'
4) V.Rajyalakshmi: "Environment and Sustainable Development" APH Publishing Corporation New Delhi (2004).
५) वर्तमानपत्र/ नियतकालीकातील प्रकाशित लेख.
6) www.oecd.org
7) www.unc.edu

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed Dist.Nanded

# Current Global Reviewer

UGC Approved


# CLIMATE CHANGE AND AGRICULTURAL CRISIS IN MAHARASHTRA


Department of Geography ... College, Ghatnandur

Tq. Ambajogai ... (M.S.)





Tq. Ambajogai ... (M.S.)



www.rjournals.co.in



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq. Mukhed Dist. Nanded

CURRENT GLOBAL REVIEWER
www.rjournals.co.in
Vol 1 Issue 1, Sept. 20 2017
UGC Approved
Sr. No. 64310
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 2.143


| | | | |
|---|---|---|---|
| | | Shrirangrao, Bhange S.D. | |
| 22 | Geographical study of Watershed in Osmanabad District | Mr. Khadke V. V. , Hulpalle S.D. | 71 |
| 23 | Fears And Effect Of Global Warming | Dr. Ramdas Madale | 74 |
| 24 | Media In Support Of Sustainale Development | Dr. Sunil Khandebharad | 76 |
| 25 | Human Resource Development In Nandurbar District, Maharashtra. | Hange A.K. , Gavit S.S. | 79 |
| 26 | Urban Climatic Condition Of Solapur City A Geographical Survey | Dr.Tatipamul.R.V, Dr.Anigunte V.S, Smt.Koli J.N | 82 |
| 27 | Shifting Of Chemical Farming To Organic Farming: A Step Towards Mitigation Of Climate Change Impacts And Economic Farming | Mukke V. K., A. M. Late | 84 |
| 28 | Status of Ground Water in Marathwada Region | Mr. Khadke V. V., Dr.Vijay Baisane, Dr. Rupavate R.L | 88 |
| 29 | Irrigation and Agriculture Development in Yavatmal District | Dr. Kadam N.B. | 91 |
| 30 | Impact of Climate Change on Agriculture | Kamble S.N. | 95 |
| 31 | A Study of Spatio-Temporal Scenario of Agriculture in Parbhani District of Maharashtra | Dr.Bhagwan P. Shendge Mr.Balaji R.Gurude | 97 |
| 32 | A Geographical study of General Landuse In Jalna District (M.S.) | Dr. Tathe Sarjerao Vishwanath | 102 |
| 33 | An Analysis of Temporal Changes in Crop Pattern in Latur and Nilanga Tahsil (1993-96 to 2010-13) | Mr. O.W. Jadhav Dr. P.V. Poul | 106 |
| 34 | "Impact Of Climate Change On Livestock In India" | Dr Shivaji Shankar Maske | 114 |
| 35 | हवामान बदल आणि शेतकरी आत्महत्या : भौगोलिक अभ्यास | जाधव एस. व्ही , डॉ. पिसाळ एच. जी., पोटे बी. टी. | 118 |
| 36 | बदलते हवामान व शेतकरी आत्महत्या | डॉ. सुनिता एस. शिंदे , श्री. शिंदे डि.आर. | 120 |
| 37 | औद्योगिक, रासायनिक व्यवसाय व तापमान वाढीचा मानवी आरोग्याव परिणाम एक भौगोलिक चिकित्सा | डॉ. देशमुख एस.वी. | 123 |
| 38 | परभणी जिल्ह्यातील कापूस पिकाखालील भूमीउपयोगावर हवामान बदलाचा प्रभाव : भौगोलिक अभ्यास | डॉ. कळसकर एस. एन. श्री. धावने डी. एस.. | 125 |
| 39 | परभणी जिल्ह्यातील कापूस पीक उत्पादकता निर्देशांक : एक भौगोलिक अभ्यास (२००० ते २०१०) | प्रा.डॉ. पाटील बी.टी. प्रा. डॉ. गोंड एन.एस. | 128 |
| 40 | पर्जन्य वितरण व कालनिहाय नगदी पिक लागवडीचा बदलता कल : औरंगाबाद जिल्हा विशेष संदर्भ | डॉ.शोभा भानुदासराव दुधाटे | 130 |
| 41 | हवामान बदल आणि महाराष्ट्रातील कृषी संकट | केंद्र गणपत गंगाधर | 134 |
| 42 | बिनगाव ग्रामपरातील पारंपारिक शेती व आधुनिक शेती पध्दतीचा तुलनात्मक अभ्यास | डॉ. मुळे अंबादास मारोतीराव | 137 |
| 43 | महाराष्ट्रातील कृषी भूमि उपयोगाचे बदलते प्रारूप : एक | प्रा.डॉ.पीसाळ एच.जी. | 141 |




PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Ta.Mukhed.Dist.Nanded

(74) Climate Change And Agricultural Crisis In Maharashtra
CURRENT GLOBAL REVIEWER
www.rjournals.co.in
Vol 1 Issue I, Sept. 20 2017 | UGC Approved Sr. No. 64310 | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 2.143

(23)

# FEARS AND EFFECT OF GLOBAL WARMING

Dr. Ramdas Madale
Dept. of Geography,
S.V. College, Mukramabad,
Dist Nanded

During the post two countries, carbon dioxide in the atmosphere has increased dramatically. The probable cause in the burning of fossil fuels and burning of forests by farmers. Scientists have been worrying that growing burden of carbon dioxide and other gases may change the earth climate. normal circumstances, much of the solar radiation that penetrates the earth atmosphere is re-rediated as heat from the earth's surface and dissipates into space. But an increase of carbon dioxide allows most solar radiations to penetrate the atmosphere, but prevents part of the heat re-radiated by the land and water bodies from escaping into space. As carbon dioxide accumulates enough heat may be trapped to gradually warm the atmosphere.

Other gases that contributes to the green house effect are methane and chloro fluorocarbons. Methane is attributed to relate from livestock manner, additional rice fields and digestion of termites proliferating on dead wood left by worldwide clearing of forests. Most emission from industrial plants and factories fall in the areas nearby. Some are carried away by winds to be washed from the sky be snow, rain or mist. But some chemicals, such as chlorofluro carbons, do not dissolve or recombine at lower levels. They rise to higher level and contaminate the stratosphere. Chlorofluorocarbons are used are refrigerants and in some places, still used as spar can propellants. They add to the green house effect as they drift upwards.

**Fears of Global Warming**

**i) Rise in Temperature**

According to the inter government panel on climatic change (IPCC) set by the United Nation Environment Protection (UNEP) in 1988, the world is already 0.5 degree Celsius warmer than in pre-dustrial times, by the turn of the next century the planet would be further warmer by 3 degree Celsius.

**ii) Climatic Changes**

The popular misconception that the global warming effect would be beneficial is wrong. Large areas of the world will experience climatic shocks. Some areas may lose 30 percent of their annual rainfall with problem accompanying to agriculture, food supply, forest, health, soil moisture, drinking water supply and public health.

**iii) Rise of Sea Level**

Rice in temperature of the oceans would result in melting of Arctic sea, which would result in a rise in sea level around the world. Temperature of ocean water near surface have already risen since the beginning of the century by 0.3 and 0.9 degree Celsius. Sea-level measurements over the same period suggest an average global rise of 15 centimeters. If atmospheric $Co_2$ levels double the resulting rise in the sea level very between 30 to 50 centimeters by the year 2050. If the latter increase occurred many major coastal cities would inundated.

A one metre rise in sea level would flood over 90 percent of Bangladesh and 50 percent of Calcutta. Other countries like Egypt and India would suffer on large scale. Many small island nations are at great risk and some would even disappear.

**iv) Climate Refugees**

People forced by starvation, due to agricultural loss, flooding or drought, many people would be moving within countries or even outside the countries. The United Nation is seriously

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Ta Mukhed Dist Nanded

CURRENT GLOBAL REVIEWER
www.rjournals.co.in | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Vol I Issue I, Sept. 20 2017 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

thinking with what to do with the worlds 'climatic refugees'. These refugees will be the most symbol of global warming.

### Effect of Global Warming

All the above fears of the global warming with possible future effects of climatic changes were brought to the notic of the people in the world in 1988 by the leading climatic scientists of NASA in the U.S.A. some of these effects were as follows:

i) That fifty percent of the countries in the world suffering from drought.

ii) 50 percent agricultural production was lost.

iii) Water levels Mississippi river ten metres below the normal and therefore 2000 barges remain idle on the bank of the river.

iv) First five months of 1988 were the warmest months during the last 130 years.

NASA scientist in the book *'Greenhouse Effect'* gave some international contexts for events that occurred in 1988. These events were as fallows :

i) 75 percent of Bangladesh was inundated by huge floods with 25 percent its population being made homeless. 3000 died in monsoon floods and 5000 in tropical cyclone.

ii) In Anhui Province of China 70000 wells ran dry but in other part of the country 1400 died in floods and storms.

iii) 25 percent Jamaicans became homeless in the wake of Hurricane.

iv) In Nicara-gua the town of Bluefield was devastated by Hurricane and 1500 sq.km. forest was flattened.

v) In the drought prone area of Africa 200 millimeters of rainfall in 24 hours on Khartoum and more than a million were made homeless and Gabon had its floods in 20 years.

### How to stop Global Warming?

So far no one has yet developed any theory or solution to the global warming effects and since the sources of pollution are very widespread, ranging from household consumption of energy resources to transport to electricity to gas to oil to agriculture to deforestation. The solution to the global warming lies not in the hand of one country, but of all. Saving in carbon emissions in one part of the world are useless if it is neglected in another.

About 70 percent of world's population breathes unhealthy air. The use of leaded petrol and traffic conjections in developing nations create health hazards. Even rural residents suffer from indoor pollution and wind born pollutants. Air pollution cause disease such as cancer, respiratory, heart and lung diseases, genetic defects and mental retardation.

The psycho-social environment is a unique creation of man himself. Social and medical scientists have clearly established association between psychological environment and prevalence of certain diseases. For example, it has been shown that lung cancer is caused by chemical substances present in cigarette smoke but the habit of smoking is often due to psycho-social causes.

**Conclusion**

The study of ill health or disease is termed as epidemiology. The epidemilogical approach examines the relative frequency of a disease within defined population or a fraction of it that may be a large or small. It is an important way of studying the influence of environmental contaminants on human being. It composes two main objectives of epidemiology is to understand or discover the cause of disease and suggest best means of prevention for disease or controlling their spread and provide guidance to health services.

Reducing the amount of pollution is vital for us as human and for the future of the earth. We all need to advocate preventing pollution and start recycling and being energy efficient. Now get into groups of three or four and discuss the information that you found over the types of pollution, ways to prevent pollution, how pollution effects humans, prevention and global warming.

**References**

1) R.A. Verheij, "Explaining urban-rural variations in health : A review of interactions between individual and environment," Social Science and Medicine, Vol.42, No.6, 1996, Pp.923-935

2) S.T. Ingle, at.al., Environmental studies, Prashant Publication, Jalgaon-425001

3) Shinde, Telang, at.al, Environmental Studies, Sheth Publishers Pvt. Ltd., Mumbai.

4) Sawant, Nandkumar, at.al, Globalization : Issues and Challenges for India, Published by Dept. of Geography, Smt. Parvatibai Chowgule College, Margaon-Goa

5) National conference on 'Goble warming and climate change : Impact and approaches to mitigation', 13th and 14th March, 2009, Organized by Rajarshi Shahu College, Latur-413512

6) Geographical Analysis, of Union of Geographic Information Technologists (UGIT), Department of Geography, Bangalore University, Bangalore, India, Vol.2, November-1, June 2013

7) Peer Reviewed International Research Journal of Geography, Maharashtra Bhugol shastra Sanshodhan Patrika, MBP Vol.32, No.1, Jan-June 2015.



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad

# CURRENT GLOBAL REVIEWER

Half Yearly
Issue X Vol II, Jan. 2018

UGC Approved
Sr. No. 64310

ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139


# Current Global Reviewer

## UGC Approved International Research Refereed Multidiciplanary Journal

Editor in Chief
**Mr. Arun B. Godam**


ISSUE X Volume II ( Half Yearly)
Published on Jan. 2018



Editorial Office Address :
Khadgaon Road, Kapil Nagar, Latur, Dist. Latur 413512 (M.S.) India

Contact- 8149668999
Email-
hitechresearch11@gmail.com



SHAURYA PUBLICATION
Latur

Publisher--
Shaury
Publication
Kapil Nagar, Latur
Contact- 8149668999

Rs. 400/-



EXECUTIVE EDITORS

**Dr. ChittaRanjan Panda**
P.G. Deptt. Of Odia
Shailabala Women's Autonomous College , Cuttack – (Orissa)

**B.J. Hirve**
Dept. of botany
VasantMahavidyalaya,
Kaij, Dist. Beed. (M.S.)

**Dr. U.T. Gaikwad**
Dept. of Geography,
Smt. S. D. M. College
Latur, Dist. Latur (M.S.)

**Dr. PravinDiddeshwarShete**
Dept. of Zoology, Maharashtra
UdaygiriMahavidyalaya, Udgir,
Dist. Latur

**MaimanatJahanAra**
Head, Dept of Political Science,
Sir Sayyed College,
Aurangabad, Dist. Aurangabad

**DrU.V.Panchal**
H.O.D, Dept of Commerce,
Deogiri College,
Aurangabad, Dist. Aurangabad

**Dr M.U. Yusuf**
Dept of Commerce,
Sir Sayyed College,
Auranbadad, Dist. Aurangabad

**Pro. S.B. Karande**
Dept. of Economics,
ShriBhausahebVartak College,
Borivali (W), Dist. Mumbai.

**Dr. Hanumant Mane**
R.Guide& Head,
Dept. of Marathi,
Shivchatrapati College,
Kalam Dist Osmanabad(M.S.)

**Dr. SachinKadam**
Dept. of Hindi
Nagarpalika Art D.J. Malpani Comm. & B.N. Sarda Sci. College,
Sangmner, Dist. Ahmadnagar (M.S.)


*www.rjournals.co.in*

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya

| | | | |
|---|---|---|---|
| 16 | महिलांचा आर्थिक विकास आणि उद्योजकता | डॉ.सतीश बाबुराव डोंगे | 70 |
| 17 | ॲरिस्टॉटलच्या 'नैतिकसद्गुण' संकल्पनेचा अन्वयार्थ | पंढगेसंतोष रमेशराव | 74 |
| 18 | ग्रामीण साहित्य संकल्पना व स्वरूप | प्रा. डॉ. हनुमंत तुकाराम माने | 77 |
| 19 | विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेच्या विकासासाठी कार्यक्रमनिर्मितीचा अभ्यास | प्रा.मरेवाड पी.पी. | 81 |
| 20 | स्त्रीउत्थानातील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्याकार्य व चळवळीचे योगदान | डॉ.पी.जी. राठोड | 86 |
| 21 | नव्वदोत्तरी स्त्रीवादी कथालेखनातील स्त्रीजीवन | प्रा.डॉ.लक्ष्मण ना.वाघमारे | 90 |
| 22 | सुरक्रगीतकाव्य | रा.प्रा.डॉ. राजेशप्रल्हादरावआरदवाड | 93 |
| 23 | मालती जोशी की कहानियों मेंस्त्री विमर्श | डॉ. लहाडे मुरलीधर अच्युतराव | 98 |
| 24 | औसातालुक्यातील जलव्यवस्थापन : एक भौगोलिक अभ्यास | प्रा.डॉ.आर.एस. धनुश्वर | 102 |
| 25 | मानव विकास एक दृष्टीक्षेप | प्रा. रविंद्र बाबुराव बावीसकर | 105 |
| 26 | छत्रपती शिवाजी महाराजांचे लष्करी धोरण : एक दृष्टिक्षेप | प्रा.डॉ.गुलाब हरी निकुंभ | 107 |


PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Shirur Tajband Ta.Mukhed Dist.Nanded

Half Yearly

# CURRENT GLOBAL REVIEWER

Issue X Vol II, Jan. 2018 | UGC Approved Sr. No. 64310 | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

# मानव विकास एक दृष्टीक्षेप

प्रा. रविंद्र बाबुराव बावीसकर
विभाग प्रमुख संरक्षणशास्त्र , स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद, ता. मुखेड, जि. नांदेड

(26)

**प्रस्तावना :**

संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम यांनी जागतिक मानव विकास अहवाल २०१५ नुकताच प्रकाशित केला आहे. नवी दिल्लीपासून ते गल्लीपर्यंत विकासाचे प्रमाण मोजण्यासाठी प्रामुख्याने मानव विकास निर्देशांकाला आधार घेतला जात आहे. तसेच २१ व्या शतकामध्ये राजकिय,आर्थिक,सामाजिक,शैक्षणिक अशा सर्वच स्तरांवर मानव विकास निर्देशांकाचे महत्व वाढत असताना जागतिक मानव विकास अहवाल तसेच मानव विकास व मानव निर्देशांक या संकल्पनांचा आढावा प्रस्तुत शोध निबंधात घेण्यात आला.

**मानव विकासाची संकल्पना :**

मानव विकास ही एक व्यापक संकल्पना असून या मध्ये मानवाच्या सर्वांगिण कल्याणाचा विचार महत्वाचा आहे. ही संकल्पना समजून घेताना आपणास प्रामुख्याने डॉ.मेहबूब उल हक व नोबेल पारितोषिक विजेते डॉ.अमर्त्य सेन यांच्या विचारांचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. डॉ.हक म्हणतात, मानवास जास्तीत जास्त संधी उपलब्ध करुन देणे. या संधी अमर्याद व वेळेनुरुप बदलता येणाऱ्या असाव्यात. मानवाची मिळकत ही उत्पन्न वाढीच्या आकड्यांत दिसण्याऐवजी ज्ञानवृध्दी,उत्तम आहार व आरोग्य सुविधा, सुरक्षित जीवनमान,शारीरिक वेदना व गुन्हेगारीपासून सुरक्षितता, फावला वेळ घालविण्याचे समाधान, राजकिय व सांस्कृतिक स्वातंत्र्य यात दिसेल. तसेच विकासाचा मुख्य उद्देश मानवासाठी अशा सामाजिक वातावरणाची निर्मिती करणे ज्यात आरोग्यसंपन्न व नाविन्यपूर्ण जीवन जगता येईल, असा असावा. डॉ.अमर्त्य सेन मानव विकास संकल्पना विशद करताना म्हणतात कि, मानव विकास हा एक असा दृष्टिकोन आहे, ज्यात मानवी जीवनाचा एक भाग असलेल्या अर्थव्यवस्थेला विकासापेक्षा तेथील मानवी जीवन वृध्दींगत ,विकसित होणे गरजेचे आहे.

**संयुक्त राष्ट्र संघटना आणि विकास :**

संयुक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रमाच्या पहिल्या अहवालानुसार,मानव विकास म्हणजे लोकांना मिळणाऱ्या संधीचा परीघ मोठा करण्याची एक प्रक्रिया आहे. थोडक्यात ढोबळमानाने असे म्हणता येईल की, मानवाचा केवळ आर्थिक विकासच नव्हे तर त्या सोबतच सामाजिक, शैक्षणिक,राजकिय,मानसिक, सांस्कृतिक इ. अशा सर्व अंगानी विकास होणे म्हणजे मानव विकास होय. मानव विकास निर्देशांक मानव विकास ही बहुअंगी संकल्पना असून मानव विकासाचे मोजमाप करणे ही गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. मानव विकास निर्देशांक ही स्थूलमानाने आयुर्मान,ज्ञान प्राप्त व चांगले राहणीमान या तीन सामाजिक घटकांची सरासरी होय. अथवा मानव विकास निर्देशांक म्हणजे सरासरी आयुर्मान निर्देशांक,शिक्षणाची प्राप्ती निर्देशांक व जीवनमान निर्देशांक या तिन्हींची समभारीत सरासरी होय. सरासरी आयुर्मान,शालेय सरासरी वर्षे, शालेय अपेक्षित वर्षे व दरडोई उत्पन्न इ.मानकांना समान महत्व देऊन मानव विकास निर्देशांक काढला जातो. या निर्देशांकाचे एकूण मूल्य ० ते १ च्या दरम्यान असून निर्देशांक जेव्हा १ या अंकाच्या जवळ असेल तेव्हा देशाचा विकास चांगला असतो.

**भारत आणि मानवी विकास :**

भारत देश भविष्यात महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत असताना आपल्या शेजारील राष्ट्राची मानव विकासातील स्थिती जाणून घेणे महत्वाचे आहे. या मध्ये श्रीलंका,चीन,मालदिव, भूतान व बांगलादेश,नेपाळ,पाकिस्तान व अफगाणिस्तान या देशांचा प्रामुख्याने समावेश असून यांना १८८ देशाच्या यादीमध्ये अनुक्रमे ७३,९०,१०४,१४७, व १७१ या क्रमांक लागतो. यामध्ये उच्च विकसित गटामध्ये श्रीलंका,चीन,मालदिव या देशांचा समावेश होत असून यांचे मानव विकास निर्देशांक अनुक्रमे ०.७५७, ०.७२७ व ०.७०६ आहेत भूतान बांगलादेश हे मध्यम विकसित गटामध्ये येत असून यांचे निर्देशांक अनुक्रमे ०.६०५ व ०.६७० आहेत. तर उर्वरित नेपाळ,पाकिस्तान व अफगाणिस्तान हे देश निम्न विकसित गटामध्ये येत असून यांचे निर्देशांक अनुक्रमे [illegible], [illegible] व ०.४६५ आहेत भारताचा निर्देशांक [illegible] आहे. यावरुन असे म्हणता येईल की,श्रीलंका,चीन,मालदिव या देशांची मानव विकासातील प्रगती ही



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed Dist.Nanded

भारतापेक्षा अधिक चांगली आहे. या बाबीचा सूक्ष्म विचार करता भारताच्या मानव विकासात वाढ करण्यास बराचसा वाव आहे. संयुक्त विश्लेषण विषय या मानव विकासासाठी कार्य हा आहे. या अहवालामध्ये एकूण सहा प्रकरणांमध्ये सदरच्या विषयाचे विविधि अंगाने विश्लेषण केले असून एकूण १६ परिशिष्टांतर्गत विकासाच्या विविध निर्देशांकाची स्थिती मांडण्यात आली आहे. हा अहवाल मानव विकास व कार्य यांच्यातील अंतरसंबंधांबाबत सविस्तर भाष्य करतो. यामध्ये कार्य ही संकल्पना नोकरी किंवा रोजगार या बाबीपुरती मर्यादीत नसून ती यापेक्षाही खूप व्यापक स्वरुपाची आहे. कारण नोकरी किंवा रोजगार यामध्ये असे अनेक विषय समाविष्ठ होऊ शकत नाहीत जे विषय मानवी विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहेत. उदा.बालकांचे संगोपन, आई-वडीलांचे संगोपन,स्वयंसेवा व सर्जनशील कार्य इ. जागतिकीकरण व डिजिटल क्रांती यावरही प्रकाश टाकण्यात आला आहे. अत्यंत जलद गतीने विकसित होत असलेल्या या जगामध्ये जागतिकीकरण व डिजिटल क्रांतीने मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध करुन दिलेल्या आहे.पण त्या सोबतच काही समस्या सुध्दा निर्माण
झालेल्या आहेत. समस्या म्हणजे संधी मोठ्या उपलब्ध प्रमाणात निर्माण झाल्या असल्या.तरी त्यांची समान प्रमाणात विभागणी झालेली नाही.त्यामुळे काहीच लोकांना याचा लाभ मिळत असून बहुतांश लोक यापासूनच दूर आहेत. एका बाजूस महिन्याला भरमसाठ वेतन घेणारे लोक आहेत, तर दुसऱ्या बाजूस मोठ्या प्रमाणात बेजोरगारी आहे. या विषमतेमध्ये प्रामुख्याने स्त्रिया मोठ्या प्रमाणात भरडल्या जात आहेत. शाश्वत विकासाचा विचार करता सध्याच्या पिढीसाठी व भविष्यातील पिढ्यांसाठी अनेक संधी निर्माण करुन देणे ही काळाची गरज आहे. अहवालाचा निष्कर्ष सांगतो की, कार्याच्या सहाय्याने मानव विकास तेव्हाच साध्य करता येऊ शकेल जेव्हा, शासनाची ध्येय धोरणे ही सर्व प्रकारच्या देशांतर्गत उत्पन्न व उत्पन्न वाढीच्या दृष्टीने सुलभ असतील, कार्याच्या संधी या योग्य आर्थिक लाभ देणाऱ्या व समाधान देणाऱ्या असतील, कामगारांच्या क्षमता व कौशल्य वाढीसाठी पोषक असतील, कामगारांचे अधिकार,सुरक्षा आणि कल्याण निश्चित करणाऱ्या असतील. संघटनांना प्रोत्साहन देणे.इ.बाबी विचारात घेऊन धोरणे निश्चित करावयास हवीत. उत्तर कार्याच्या निर्धारणासाठी अहवालात रोजगार निर्मिती व उद्योग विकास,कार्यात गुणवत्ता व अधिकार, सामाजिक सुरक्षा, शासन व समाज यांच्यातील संवद हे चार आधारस्तंभ सूचित करण्यात आले आहेत. या आधारस्तंभाच्या अनुंषगाने देश खऱ्या अर्थाने मानव विकासासाठी कार्य ही बाब साध्य करु शकेल.

थोडक्यात मानव विकासाच्या व्याख्येचा विचार करता असे म्हणता येईल, की कार्याच्या अनुषंगाने केंद्र व राज्य शासनाच्या सक्षम धोरणाची रचना करुन त्यांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यकता असेल, ज्यामध्ये लोकांना ज्ञानवृध्दी ,उत्तम आहार व आरोग्य, राजकीय व सांस्कृतिक स्वांतत्र,समाजात मिसळण्याची जाणीव इत्यादी संधी प्राप्त होऊ शकतील व मानवासाठी असे सामाजिक वातावरण निर्माण होण्यास मदत होऊन ज्यात मानव आरोग्यसंपन्न जीवन ... कार्य करुन जीवन व्यतीत करेल.

**मानव विकासाची उदिष्ट :**

मानव विकास ही समावेशक संकल्पना आहे. यामध्ये व्यक्तीच्या क्षमतांचा पूर्ण विकास साधण्यासाठी ... आणि सुनियोजित धोरणांची व कार्यक्रमांची आवश्यकता असते. राष्ट्राचा सामाजिक, आर्थिक विकास साध्य ... भारतातील मोठ्या कार्यकारी लोकसंख्येचा फायदा करुन घेणे ही आज सर्वात मोठे आव्हान आहे. विविध स्तरावर शिक्षणाची उपलब्धता करुन देण्यात येत आहे.शिक्षणाबरोबर आरोग्य सुदृढ रहावे म्हणून आरोग्याच्या सुविधा देखील मोठ्या प्रमाणात उपलब्ध् करण्यात आल्या आहेत. ही सर्व प्रक्रिया करण्यामागे काही उद्दिष्टे आहेत.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


P.Memorai Personnel Management.
Agarwl J.C.,Modern India Education,New Delhi,Shipra Publication,२००३.
Kapur J.S.(ed), Global Education Change NCERT, New Delhi २००४.


PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukhed Dist.Nanded

NAAC Reaccredited 'A' Grade

Parth Vidya Prasarak Mandal's

ISO 9001:2008 Certified

# BABUJI AVHAD MAHAVIDYALAYA

Pathardi, Dist : Ahmednagar

(Affiliated to Savitribai Phule Pune University,Pune )

# ertificate

UGC Sponsored

## National Level Seminar

on

**"Strategy of War and Psychology"**

12th & 13th January, 2018

This is to certify that Prof. / Dr. /Mr./Ms. Sandeep B. Gavate Vivekanand Mahavidyalaya, Muksamabad, (Mukhed) attended the two days National Level Seminar on **"Strategy of War and** **chology"** on 12th & 13th January, 2018.

He / She has presented a paper entitled भारताच्या सुरक्षा व्यवस्थेला आयसिस या दहशतवादी संघटनेच्या वैचारिक प्रसाराचा धोका / red the session / addressed the session.

hlmanyu Dhormare
Convener

Dr.Ashok Kanade
Co-convener

Dr.G.P.Dhakane
Principal

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed Dist.Nanded

Sponsored by

Special Issue 7
January 2018

ISSN - [illegible]
UGC Approved Sl. NO. [illegible]
Journal No. [illegible]
IMPACT FACTOR [illegible]

# SHODHANKAN

## STRATEGY OF WAR AND PSYCHOLOGY



- EDITORS -

Dr. Abhimanyu Dhormare

Dr. Ashok Kanade

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | पेपरचे नांव | संशोधकाचे नांव | पांन नंबर |
|---|---|---|---|
| 1 | मराठेशाहीतील साडेतीन शहाणे : व्यक्तिमत्त्व विशेष | प्रा.केरकळ अर्जुन शंकर | 01 ते 04 |
| 2 | शीतयुध्द | प्रा. अरूण महादेव राख | 05 ते 07 |
| 3 | सायबर युध्द : एकविसाव्या शतकातील युध्दशस्त्र | प्रा. जाधव बी. एस. | 08 ते 12 |
| 4 | गनिमी कावा:एक मानसशास्त्रीय युद्ध तंत्र | प्रा.बप्पासाहेब रामलिंग शेजूळ | 13 ते 18 |
| 5 | मराठेकालिन गनिमी युध्दतंत्र | प्रा.डॉ.भारती नवथर | 19 ते 23 |
| 6 | इतिहास लेखनामागील इतिहासकाराची मानसिकता | प्रा.डॉ. सय्यद मुजीब मुसा | 24 ते 27 |
| 7 | दहशतवाद, दहशतवादी आणि मानसशास्त्र | प्रा. अमित हुकुमचंद राऊत | 28 ते 33 |
| 8 | यावलीचा स्वातंत्र्य संग्राम | डॉ.अनुप्रिता जे.मापारी | 34 ते 37 |
| 9 | विनोबा भावे यांची अहिंसक क्रांती विचार धारा : भूदान चळचळीच्या संदर्भात | प्रा.धनेश मधुकर हरड | 38 ते 41 |
| 10 | मानसशास्त्रीय युद्ध आणि तिचे महत्त्व | डॉ.तोडकर बी.डी. | 42 ते 50 |
| 11 | दहशतवाद | प्रा.डॉ.गो.प.भालेराव | 51 ते 56 |
| 12 | भारतीय स्वातंत्र्यलढयात परदेशी महिलांचा सहभाग | प्रा काकडे एल.बी. | 57 ते 61 |
| 13 | दहशतवादयांची मानसिकता | प्रकाश साबळे | 62 ते 68 |
| 14 | दुसरे जागतिक महायुध्द व हैद्राबाद संस्थान | प्रा.डॉ. प्रशांत देशमुख | 69 ते 83 |
| 15 | भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील मवाळांचे योगदान | प्रा. डॉ. राजाराम रामदास सोनवणे | 84 ते 88 |
| 16 | युध्दामध्ये मानसशास्त्राची भूमिका व योगदान | प्रा. रामेश्वर बाबासाहेब राऊत | 89 ते 92 |
| 17 | भारताच्या सुरक्षा व्यवस्थेला आयसिस या दशहवादी संघटनेच्या वैचारिक प्रसाराचा धोका | प्रा. संदीप गवते | 93 ते 101 |


PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalay
Mukramabad Ta.Mukhed.Dist Nande

ISSN NO. 2250-0383

# भारताच्या सुरक्षा व्यवस्थेला आयसिस या दहशतवादी संघटनेच्या वैचारिक प्रसाराचा धोका

17

प्रा.संदीप भा.गवते
संरक्षण शास्त्र विभाग,
विवेकानंद महाविद्यालय मुक्रमाबाद,
ता.मुखेड जि.नांदेड.

**सारांश**

वरील शोधनिबंधांमध्ये माझा अभ्यासाचा उद्देश हा आहे की, भारतामध्ये आयसिस या दहशतवादी संघटनेच्या वैचारिक प्रसाराचा धोका कोणता होऊ शकतो. ही संघटना जागतिक स्तरावर कार्य करत असताना कोणत्या साधनाच्या माध्यमातून आपला प्रसार करते. जसे की इंटरनेट, वैचारिक साहित्यांचा प्रभाव ह्याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न आहे. आयसिस या संघटनेचा वैचारिक आधार हा वहाबी पर्याय आहे. त्यामुहे आयसिस ही शिया लोकांच्या धार्मिक स्थळावर हल्ला करताना दिसून येते. आयसिसच्या उदय आणि धोक्याचा विचार करताना त्याच्या उदयाची पार्श्वभूमी ही महत्वाची ठरते. पश्चिम आशियातील गुंतागुंतीच्या हितसंबंध आणि परस्परां मधील वैमनस्य यातून आयसिसचा उदय झाला आहे. आयसिसचा उदय होत असताना सौदी अरेबियासह काही अरब देशांनी मदत केली आहे. या दहशतवाद्यांना मुबलक पैसा, शस्त्रास्त्रे दिली. या संघटनेकडे जाणाऱ्या तरुणांना दुर्लक्ष केले. या गुंतागुंतीतून निर्माण झालेला हा भस्मासूर आता जगाच्या सुरक्षेसमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. (आयसिस - इस्लामिक स्टेट इन इराक अँड सिरीया)

दहशतवाद जशी जागतिक समस्या आहे त्याच प्रमाणे ती दक्षिण आशियातील मागच्या काही दशकातील उग्र समस्या म्हणून पुढे आली आहे. जगातील दुसऱ्या तिसऱ्या क्रमांकाची मुस्लीम लोकसंख्या भारतामध्ये पाहावयास मिळते. आयसीस या संघटनेकडून दहशतवादाच्या प्रसाराचा प्रयत्न करत असताना जागतिक मुस्लीम ऐक्याचे आवाहन केले जात आहे. भारताच्या दहशतवादी कारवाया मध्ये पाकिस्तानचा सहभाग हा सर्वात जास्त असल्याचे दिसून येते. इ.स.१९७१ च्या युध्दातील पराभव हा पाकिस्तानला सर्वात जास्त सलताना दिसून येतो. त्याचा बदला घेण्यासाठी पाकिस्तानी लष्कराकडून सातत्याने प्रयत्न होताना दिसून येतात. १९८० च्या दशका पासूनच दहशतवादाला आश्रय दिल्याचे दिसून येते. भारताविषयी पाकिस्तानी जनतेच्या मनात विषवृत्ती निर्माण करण्यात आली आहे. दहशतवादाच्या माध्यमातून भारताविरोधातील संघर्ष जिवंत ठेवण्याचा पाकिस्तानच्या सुरक्षा यंत्रणेचा प्रयत्न आहे.



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq Mukhed Dist Nanded

ISSN NO. 2250-0383

कल्याणमधील चार युवक आयसिसच्या बाजूने लढण्यासाठी सिरीयामध्ये गेल्याचे समोर आल्यानंतर याविषयी भारतामध्ये धोका आहे का याचा विचार सुरु झाला. लढ्यासाठी आयसिसच्या भारत आणि भारतीयांच्या धोक्याचा विचार करताना प्रत्यक्ष या संघटनेच्या दहशतवाद्यांकडून कारवाया होऊ शकतात का. वैचारिक प्रसारातून भारतातून मुस्लीम तरुण सिरीयामध्ये जातील किंवा या प्रसारातून भारताच्या सामाजिक सौहार्दतेला धोका पोहोचेल का आणि आखाती देशांसारख्या मुस्लीम बहुल भागामध्ये असणाऱ्या भारतीय नागरिकांना किती धोका पोहचतो या तीन स्तरावर विचार करावा लागेल.

आयसिस या संघटनेचा सिरीया आणि इराकमध्ये संघटनेच्या ताब्यात असणाऱ्या प्रदेशावरील सत्ता कायम करण्यासाठी लक्ष केंद्रीत केल्याचे दिसून येते. अन्य भागामध्ये सत्तेच्या विस्तार करण्यासाठी अन्य छोट्या संघटनांचा आधार घेण्याचे आयिससचे धोरण दिसते. यामध्ये नायजेरियातील बोको हराम तालीबान मधील गट, इजिप्तच्या सिनाई द्विपकल्पावरील मुलतत्व वादी संघटना यांना हाताशी धरल्याचे दिसून येते. या वरील घटनांचा अभ्यास केला तर असे दिसून येते की अशा प्रकारचा प्रयत्न भारतामध्ये केला तर आयसिसला भारतातील काही गटांचा आधार मिळेल का, हे पाहावे लागेल. आयसिस कडून भारतामध्ये काही प्रमाणात कारवाया केलेल्या इंडियन मुजाहिद्दीन, सिमी, सारख्या संघटनांना हाताशी धरले जाईल का ? या दोन्ही संघटना २००० नंतरच्या दशकामध्ये सक्रीय होत्या, मात्र त्यांचे काही पोलीसांच्या हाती लागल्यानंतर या संघटना विस्कळीत झाल्या आहेत. बाबरी मस्जिद प्रकरणानंतर भारतामध्ये परिस्थिती वेगाने बिघडली आहे, हे वास्तव नाकारुन चालणार नाही. ह्याच दरम्यान सिमी या संघटनेची स्थापना करण्यात आली. सुरुवातीला लोकशाही मार्गाने आपले प्रश्न मांडण्याचा सिमी या संघटनेचा उद्देश होता. मात्र, लोकशाही मार्गाऐवजी या संघटनेच्या माध्यमातून दहशतवादी कारवाया करण्याचे कट रचण्यात येत होते. हे शासनाच्या निदर्शनास आल्यानंतर इ.स.२००१ मध्ये केंद्र सरकारकडून सिमीनंतर नेही घालण्यात आली. या बंदीमुळे सैरावैरा झालेल्या तरुणांनी इंडियन मुजाहिद्दीन या दहशतवादी संघटनेची स्थापना केली. गुजरातमधील गोधरा हत्याकांड आणि त्यानंतरच्या घटना पासून या संघटनेने मुस्लीमांवर अन्याय होत आहे असे चित्र रंगवण्यास सुरुवात केली. या संघटनेने २००७ नंतर देशाच्या विविध भागांमध्ये बॉम्बस्फोट व हल्ले केले आहेत. या संघटनेच्या माध्यमातून वेगवेगळ्या मोड्युलच्या माध्यमातून कारवाया करण्यात येतात. त्यात एका मोड्युलकडे कोणती जबाबदारी याची माहिती दुसऱ्या मोड्युलला नसते. त्यामुळे देशात नेमके किती मोड्युल आणि किती दहशतवादी या संघटनेच्या माध्यमातून सक्रीय होते याचा नेमका अंदाज आलेला नाही.



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed Dist.Nanded

सिमी आणि इंडियन मुजाहिद्दीन यांच्यामध्ये असणाऱ्या फरकामधूनच भारतातील दहशतवादी संघटनांमध्ये होत असलेल्या बद्दलांची दिशा दिसते. सिमीकडून राजकीय सत्ता काबीज करणे हे ध्येय समोर ठेवण्यात आले होते. तर इंडियन मुजाहिद्दीन या संघटनेने भारतामध्ये मोठ्या प्रमाणात अस्थिरता निर्माण करण्याचे उद्दिष्ट्य समोर ठेवले होते. भारतामधील ज्या हिंदुत्ववादी संघटना आहेत जसे की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि अन्य संघटनांना लक्ष्य करण्यासाठी प्रयत्न होता. इंडियन मुजाहिद्दीन कडून उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, दिल्ली, बिहार, कर्नाटक या भागामध्ये दहशतवाद्यांकडून तरुणांची भरती करण्यात येत असल्याचे उघड झाले आहे. भारतातील तरुणांमध्ये आयसिस या संघटने विषयी आकर्षण असल्याचे दिसून येते. यासीन भटकळ तुरुंगात असताना त्यांने आपल्या पत्नीशी फोनवर बोलताना असे सांगितले की तु काळजी करु नको, मला सोडविण्यासाठी आयसिस येणार आहे.

वरील संभाषणावरुन असे लक्षात येते की, भारतातील तरुणांना या संघटनेविषयी आकर्षण दिसते. वरील गोष्टींचा विचार करता भारतामध्ये आयसिसकडून थेट कारवाया करण्याची शक्यता कमी असल्याचे दिसून येते. आयसिसचा वैचारिक प्रसार आणि त्याचे मानसिक परिणाम यांचा विचार करावा लागेल. या प्रसारातूनच भारतातील काही मुस्लीम तरुण आयसिसकडे आकर्षित झाल्याचे दिसते. इंटरनेटच्या माध्यमातून तरुणांना जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न आहे. मोजकेच तरुण इराक, सिरीयामध्ये गेले आहेत. भारतीय मुस्लीम समाजाची विचारसरणी सूफी पंथी आहे. तरीही वैचारिक संघर्षावर नियंत्रण ठेवण्याचे आव्हान भारतासमोर आहे. शिया-सुन्नी संघर्षाचा परिणाम भारतामध्ये काही प्रमाणात जाणवला आहे हे विसरुन चालणार नाही. आयसिस ने जून २०१४ मध्ये इराकमध्ये धुमश्चक्री सुरु केल्यानंतर शिया पंथियांची धार्मिक स्थळे लक्ष्य केली होती. त्याला मदत करण्यासाठीच भारतातील शिया पंथिय तरुणांनी नोंदणी करत इराकमध्ये जाण्याची परवानगी मागितली होती. भारतामध्ये शिया-सुन्नी संघर्षाची इतिहासामध्ये फारशी नोंद नाही.

**शिया-सुन्नी शितयुध्द :-**

पश्चिम आशियामध्ये मुस्लीम बहुल भाग जास्त असून सुध्दा त्याच्या मध्ये शिया-सुन्नी अशी विभागणी झालेली आहे. हे त्यांच्यातील ऐतिहासिक कारण संघर्षाला कारणीभूत ठरले आहे. महम्मद प्रेषित यांच्यानंतर मुस्लीम समाजाचे नेतृत्व कोणाकडे राहील या कारणावरुन ही विभागणी झाली आहे. समाजाचा नवा वारसदार विचारांवर आधारित असावा. असे मानणाऱ्या गुटातून सुन्नी समाज निर्माण झाला. तर मुस्लीम समाजाचा वारस हा प्रेषितांच्या रक्ताच्या नातेसंबंधा मधीलच असावा असे मानणारा गट शिया म्हणुन ओळखला जाऊ लागला. जगातील मुस्लीम लोकसंख्येचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, ८५% लोकसंख्या ही सुन्नी पंथीय



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya

ISSN NO. 2250-0383

आहे. तर शिया मुस्लीम अवघ्या १२ ते १५% पर्यंत आहे. शिया लोकसंख्या ही इराण आणि इराक देशामध्ये एकवटली आहे. शिया पंथियाच्या देशाचे नेतृत्व इराणकडे होते, तर सुन्नी देशांमध्ये सौदी अरेबियाचा सर्वात जास्त प्रभाव होता. तर सुन्नी देशांमध्ये सौदी अरेबियाचा सर्वात जास्त प्रभाव आहे. सौदी अरेबियाकडे सर्वात जास्त मक्का मदीना ही धार्मिक स्थळे आहेत. शिया सुन्नी हे शितयुध्द म्हणजे इराण-सौदी अरेबिया यांच्यातील संघर्षच असल्याचे वेळोवेळी दिसून येते. आयसिसचा प्रदेश इराणच्या शेजारी असणाऱ्या इराक आणि सिरीयामध्ये आहे. तर हुती बंडखोराच्या रुपामध्ये एक मोठा धोका सौदी अरेबियाच्या उशाला आणण्यात इराणला यश आले आहे. आयसिसच्या उद्यापागील मानसिकते मध्येही याच शिया सुन्नी वैमनस्याचे अनेक पदर दिसून येतात.

आयसिसच्या कारवायांमध्येही शियाविरोधातील त्यांचा विशेष राग दिसून येतो. इराकमध्ये करण्यात आलेल्या अनेक हल्ल्यांमध्ये शिया पंथीयांना लक्ष्यकरण्यात आल्याचे दिसून येते. सौदी अरेबिया इराण यांच्यातील शीतयुध्दाला आता इराण आणि अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, रशिया, चीन, जर्मनी या देशांमध्ये झालेल्या अणुकरारचीही पार्श्वभूमी आहे. या करारामुळे आतापर्यंत पाश्चिमात्य देशांच्या निर्बंधामुळे मुख्य प्रवाहापासून दुर असणारा इराण पुन्हा चर्चेत येईल आणि पश्चिम आशियातील सत्ता समतोल बिघडेल. आयसिसचा उदय वहाबी विचारसरणीतून आणि शिया पंथियांविरोधात झाला आहे.

**इंटरनेटचा धोका :-**

वैचारिक प्रसाराच्या माध्यमातून होत असणाऱ्या घटना पाहता इंटरनेटच्या घडामोडीवर लक्ष ठेवणे गरजेचे आहे. हैद्राबादच्या विमानतळावर अटक करण्यात आलेल्या निकी जोसेफ या महिलेच्या कार्यपध्दतीचा विचार करावा लागेल. ब्रिटनचे नागरिकत्व असलेली निकी जोसेफ इंटरनेटवरुन तरुणांना भूलवत होती. तिला संयुक्त अरब अमिरातीमध्ये अटक करण्यात आली. त्यानंतर तिला भारतामध्ये पाठवून देण्यात आले. हैद्राबाद आणि 'एनआयए' कडून करण्यात आलेल्या चौकशीमध्ये निकी जोसेफ फेसबुक आणि ट्विटरच्या माध्यमातून ती 'मॉडरेट वर्सेस लिबरल', 'व्हु इज रिअल इस्लामीक', 'दौला इस्लामीक', 'रिअल जिहादी' यांसारखे पेजेस चालवत होती. तिच्याकडे २५ हजार तरुणांची माहिती होती. त्यातील काहीजण इसिस मध्ये सहभागीही झाले होते. निकी जोसेफ आणि मोईनुद्दीनच्या संपर्कामध्ये असणाऱ्या आंध्र प्रदेश आणि कर्नाटकातील तरुणांची संख्या ५०० आहे. निकी जोसेफच्या इस्लाम वर्सेस ख्रिश्चएनिटी फ्रेंडली डिस्कशन या वेबपेजचे ५० हजार फॉलोअर होते. आयसिसशी संबंधीत मजकूर पोस्ट करत असल्यामुळे या पेजवर इ.स. २०१४ मध्ये बंदी घालण्यात आली होती. सुन्नी मुस्लीमांवर अत्याचार करणाऱ्या असद राजवटी विरोधात आयसिस यशस्वी झाली आणि त्यांना



PRINCIPAL
Swami Vivekanand ...

ा लोकसंख्या ही इराण आणि
ुख्य इराककडे होते, तर सुन्नी
ुन्नी देशांमध्ये सौदी अरेबियाचा
मक्का मदीना ही धार्मिक स्थळे
ा यांच्यातील संघर्षच असल्याचे
पणाऱ्या इराक आणि सिरीयामध्ये
अरेबियाच्या उशाला आणण्यात
सिकते मध्येही याच शिया सुन्नी

त्यांचा विशेष राग दिसून येतो.
ा लक्ष्यकरण्यात आल्याचे
ता इराण आणि अमेरिका, ब्रिटन,
ुकराराचीही पार्श्वभुमी आहे. या
ा प्रवाहापासून दुर असणारा इराण
बिघडेल. आयसिसचा उदय वहाबी

टना पाहता इंटरनेटच्या घडामोडीवर
करण्यात आलेल्या निकी जोसेफ या
नागरिकत्व असलेली निकी जोसेफ
अमिरातीमध्ये अटक करण्यात आली.
आणि 'एनआयए' कडून करण्यात
च्या माध्यमातून ती 'मॉडरेट वर्सेस
', 'रिअल जिहादी' यांसारखे पेजेस
होती. त्यातील काहीजण इसिस मध्ये
ा संपर्कामध्ये असणाऱ्या आंध्र प्रदेश
जोसेफच्या इस्लाम वर्सेस खिश्चिएनिटी
ा. आयसिसशी संबंधीत मजकूर पोस्ट
करण्यात आली होती. सुन्नी मुस्लीमांवर
यशस्वी झाली आणि त्यांना



ISSN NO. 2250-0383

शरिया कादा लागू करायचा आहे. असे तिने चौकशीमध्ये सांगितले. केंद्र सरकारच्या ... माहितीनुसार सध्या आयसिस मध्ये सात भारतीय तरुण असून सहभागी झालेल्या सहा भारतीय तरुणांचा संघर्षामध्ये मृत्यु झाला आहे. या सात तरुणांमध्ये दोन कल्याणचे, ... ऑस्ट्रेलियामध्ये स्थायिक झालेला काश्मीरी आणि अन्य चारजण तेलंगणा, बेंगलू ... ओमान व सिंगापूरमधून आयसिसमध्ये सहभागी झाले आहेत. आयसिसमध्ये सहभागी होणाऱ्या १७ तरुणांना रोखण्यामध्ये सुरक्षा यंत्रणांना यश आले आहे. केंद्र सरकारकडून केंद्रीय गृहसचिव एस.सी.गोयल यांच्या नेतृत्वाखाली १२ राज्यांच्या पोलीस महासंचालक आणि सचिवांची बैठक घेण्यात आली त्यामध्ये आयसिस या संघटनेच्या प्रसाराला आळा घालण्यासाठी धोरण निश्चित करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्र आणि तेलंगणा मॉडेल डोळ्यासमोर ठेवण्यात आले. त्यामध्ये आयसिसकडे आकर्षित झालेल्या तरुणांना अटक करणे हा पर्याय असणार नाही असे ठरले. जुन २०१५ मध्ये मुंबईजवळील मिरारोड ह्या भागातील चार तरुण आयसिसकडे आकर्षित झाले होते. मात्र दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) या तरुणांची माहिती मिळाल्यानंतर त्यांना विश्वासात घेत, धर्मगुरुंकडून त्यांना इस्लामचा खरा अर्थ सांगितला व त्यांच्या मनातील आयसिसचा प्रभाव कमी केला. असेच प्रयत्न देशाच्या इतर भागातही झाले आहेत.

इंटरनेटच्या माध्यमातून बरेच तरुण ह्या संघटनेकडे वळल्याचे दिसून आले आहे. यामध्ये श्रीनगर, गुवाहाटी सह चिंचवड आणि उन्नाव यासारख्या शहरांमध्ये इंटरनेटवर 'आयसिस' विषयी माहिती पाहण्यात येत असल्याचे समोर आले आहे. जम्मू-काश्मीर सर्वात आघाडीवर आहे.त्यानंतर आसाम,उत्तरप्रदेश,महाराष्ट्र, पश्चिम बंगाल या राज्यांचा समावेश आहे. १६ ते ३० या वयोगटातील तरुणांमध्ये हे आकर्षण सर्वांत जास्त आहे. शैक्षणिक पार्श्वभूमी असणाऱ्या तरुणांमध्ये सुध्दा आकर्षण दिसून येत आहे. भारतीय मुस्लीम तरुणांचे वहाबी पंथाकडे मन वळविण्यासाठी प्रयत्न होताना दिसत आहे. फेसबुकवर वहाबी विरुध्द सुफी असे वादही रंगत आहेत. यातूनच फेसुक पेजवर सुफीकडून ताहीर अल कादरी, तर वहाबींकडून झाकीर नाईक यांची वचने टाकण्यात येतात. आखातामध्ये हजारो भारतीय असून, त्यांच्या माध्यमातून वहाबी विचार भारतामध्ये येत आहेत. वहाबाविषयी चुकीचा प्रचार होत आहे. ... पाश्चात्य देश कारणीभूत असल्याचा आरोप होत आहे. पश्चिम आशियातील या संघर्षाचा भारताच्या अर्थव्यवस्थेवरही परिणाम होण्याची शक्यता आहे. पश्चिम आशियातून बहुतांश जगाला खनिज तेलाचा पूरवठा होतो. त्याच बरोबर भारतासाठी आणखी एक चिंतेचे कारण म्हणजे सुमारे ७० लाख भारतीय आखाती देशांमध्ये रोजगारासाठी कार्यरत आहेत.



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya

ISSN NO. 2250-0383

आयसिसला पश्चिम आशियातील बहुसांस्कृतिक समाजरचना उध्वस्त करावयाची आहे. त्याच प्रमाणे ह्या भागामध्ये पंथ व वंश यावरून खूप भेद आहेत. पुण्यातील विचारवंत प्रा.शमसुद्दीन तांबोळी यांनीही काळजी घेण्याची गरज व्यक्त केली. ते म्हणाले की, नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून मुस्लीम तरुणांना आकर्षित करण्याचा निश्चित प्रयत्न होऊ शकतो. यूट्यूब सारख्या वेबसाईडवर अशा प्रकारचे अनेक व्हिडीओ उपलब्ध आहेत. त्यामुळे या घडामोडींकडे बारकाईने लक्ष ठेवावे लागेल. ह्या प्रसाराला धर्माविषयी चुकीची चर्चा कारणीभूत असून तरुणांना इस्लाम धर्माचा खरा अर्थ समजावून सांगण्याची गरज व्यक्त केली.

**इंटरनेटवरुन रेडिक्लायजेशन :-**

इंटरनेट, सोशल मिडीया या माध्यमातून तरुणांना आकर्षित करण्याचे प्रयत्न होत आहेत. सगळे जग इंटरनेटमुळे एका व्यासपीठावर आले आहे. यातून निर्माण होणारे रेडिक्लायजेशन धोकादायक असल्याचे मुंबई पोलीस दलातील सहपोलीस आयुक्त यांनी सांगितले. पूर्वी एखाद्या तरुणाला आकर्षित करण्यासाठी सहा महिने वर्ष लागत असे.आता मात्र इंटनेटच्या माध्यमातून हे ब्रेन वॉशिंग ४० दिवसांमध्ये पूर्ण होते. त्याच बरोबर एका देशातून दुसऱ्या देशात जायची गरज उरली नाही. त्यामुळे पोलीसांचे इंटरनेट आणि सोशल मिडीयावरील घडामोडीकडे बारकाईने लक्ष देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. तरुणांना धर्म, सेक्स आणि पैशाचे आकर्षण दाखविण्यात येते. तरुणांमध्ये असणारा उत्साह अशा संघटनांना उपयोगी पडतो. आतापर्यंतच्या संघटनासाठी थेट संपर्क, खबऱ्यांचे जाळे उपयोगी पडत होते. आयसिससाठी इंटरनेट,सोशल मिडीया यांच्यावर लक्ष ठेवावे लागत आहे. सोशल मिडीयाचा वापर होत आहे. तेव्हा पासून आयसिसने आपल्या कार्यपध्दतीमध्ये बदल केले आहेत. आतापर्यंत तरुणांचा ओघ सिरीया आणि इराककडे सुरु झाला होता. मात्र नव्या कार्यपध्दतीनुसार तरुणांना इस्लामीक स्टेट मध्ये येण्याऐवजी आहे त्या देशामध्येच राहण्याची सूचना करण्यात आली आहे.

**लष्करी उपायां ऐवजी विचारांची लढाई हवी :-**

दहशतवाद कोणताही लष्करी उपाय नाही. दहशतवाद्यांशी लढत असताना त्यांना एकाकी पाडणे गरजेचे आहे.समुपदेशन महत्वाचे आहे. तरुणांना आकर्षित करण्यात ह्या संघटना यशस्वी ठरताना दिसतात. आंतरराष्ट्रीय पातळीवर घडणाऱ्या घटनांचा आपल्या देशांशी संबंध जोडू पाहतात हे चुकीचे आहे. हे तरुणांच्या मनावर बिंबवणे गरजेचे आहे. इस्लामच्या विश्वबंधूत्वाच्या विचारातून दहशतवादाशी संबंध जोडण्याचा प्रयत्न होत आहे. त्यामध्ये काही तथ्य नाही हे दाखवून द्यावे लागेल. भारतीय तरुणांना चुकीचा अर्थ सांगून फितवण्याचा प्रयत्न



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya

होत आहे. त्यामुळे तरुणांना इस्लामचा खरा अर्थ सांगून त्यांना चुकीच्या मार्गापासून परावृत्त करता येते.

अमेरिकेमध्ये ९ सप्टेंबर २००१ रोजी दहशतवादी हल्ला झाला होता. यामध्ये सौदी अरेबियाच्या नागरिकांचा हात होता. ह्या प्रकरणामध्ये त्यांना शिक्षा ठोठावण्यात आली. ही शिक्षा भोगल्या नंतर ते तरुण सौदी अरेबियामध्ये परतले. त्यावेळी त्यांनी सौदी अरेबियाच्या विमानतळावर ताब्यात घेण्यात आले आणि राजधानी रियाधजवळील उपनगरीतील एका केंद्रामध्ये नेण्यात आले. या ठिकाणी सर्व सुविधा बरोबरच धर्मगुरुची नियुक्ती करुन त्यांना इस्लामचा खरा अर्थ सांगण्यात आला. सातत्याने चांगल्या विचारांचा प्रभाव राहिल्यामुळे या तरुणांमध्ये निर्माण झालेले गैरसमज दुर झाले. महम्मद बीन नायेफ सेंटर फॉर एढव्हान्स, कौन्सीलीग अँड केअर असे या केंद्राचे नाव असून २००७ मध्ये या केंद्रांची स्थापना करण्यात आली. तरुण-प्रौढांसाठी जहालमतवाद, त्याचे धोके, परिणाम याची माहिती देण्यासाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. धर्मगुरु आणि अभ्यासकांबरोबर चर्चाही सुरु करण्यात येतात. त्याच प्रमाणे शाळांमधील विद्यार्थ्यांना फितविण्याची शक्यता लक्षात घेऊन तेथेही अधूनमधून पुस्तके, पत्रके यांच्या माध्यमातून प्रबोधन करता येईल.

**जनजागृतीचा प्रयत्न :-**

आपला धर्म, दहशतवादाला नाकारतो, आपण सारे दहशतवादाला नकार देऊ या यासारख्या आशयाच्या घोषणा नागरिकांपर्यंत पोहचविण्यात याव्यात. समुपदेशन हा या कार्यक्रमाचा केंद्रबिंदू असून तरुणांमध्ये हृदयपरिवर्तन करुन खऱ्या अर्थाने बदल घडवता येईल. समुउपदेशनाच्या माध्यमातून तुरुंगांना नियमित भेट देऊन धार्मिक, मानसिक, सामाजिक या विषयावर चर्चा करण्यात यावी. कैद्याला त्याला त्याच्या मनातील सर्व शंका सांगण्याची सुचना करण्यात येते आणि त्याच्या शंकाचे निरसन करत धर्माची खरी शिकवण त्यांना देण्यात यावी.

**धर्माचा खरा अर्थ कळावा :-**

कोणत्याही प्रकारच्या दहशतवाद्यांकडून तरुणांना फितविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असतात. त्यामुळे त्यांचे मनसुबे उधळून लावण्यासाठी त्याच पध्दतीने उत्तर देणे उपयुक्त ठरेल असे अब्दूल कादर मुकादम सांगतात. भारतातील मुस्लीमांचा विचार करताना मौलाना अबुल कलाम आझाद यांचे उदाहरण खूप महत्वाचे ठरु शकते. मुस्लीमांचे राष्ट्रीयीकरण, विश्वबंधुता आणि या राष्ट्रांशी त्यांचा संबंध याविषयी त्यांनी भाष्य केले आहे. इस्लामच्या विचारांचे दोन भाग केले आहेत. त्यामध्ये अपरिवर्तनीय आणि परिवर्तनीय अशी ही विभागणी आहे. इस्लामच्या काही मुलभूत गोष्टींचा समावेश अपरिवर्तनीय गटामध्ये केला आहे.पण त्यांचे हे



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Ta Mukhed Dist Nanded

लिखाण दोन वेळेस जाळून टाकण्यात आले. सध्या त्यांचे कुराण भाष्य उर्दूमध्ये उपलब्ध आहे. कुराणाचा व्यवहार्य पध्दतीने अर्थ लावणारे हे एक महत्वाचे साहित्य आहे.

भारतातील मुस्लीमांची लोकसंख्या १७ कोटीपेक्षा जास्त आहे. तरीही बहुतांश मुस्लीमांमध्ये वेगळेपणाची भावना काही प्रमाणामध्ये दिसून येते. यामध्ये प्रचलित शिक्षण पध्दतीचा कितपत दोष आहे हे ही तपासून पाहिले पाहिजे. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे संस्थापक हमीद दलवाई यांनाही याच शिक्षण पध्दतीला दोष दिला आहे. ते म्हणतात स्वातंत्र्याच्या काळापर्यंत आमच्या मुसलमान विद्यार्थ्यांना वेगळ्या उर्दू शिक्षणाची सोय करण्यात आली. इथल्या बहूजन समाजाशी असले-नसलेली सांस्कृतिक संबंध तोडण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करण्यात आला. उर्दू भाषेची वेगळी परंपरा निर्माण करण्यात आली. एवढे सगळे होऊनही इथले संबंध आम्ही पूर्णपणे तोडू शकलो नाही. त्यामुळे आज मुस्लीम समाज या प्रश्नाकडे गोंधळलेल्या दृष्टीने पाहत आहे. आपली भाषा आणि आपली संस्कृतीच अखेर महाराष्ट्राचा व देशाच्या समाजजीवनातले आपले स्थान निश्चित करणार आहे. याची त्याला पुर्ण जाणीव झालेली नाही. भारतीय मुस्लीमाला इथल्या समाज जीवनात रुळल्याशिवाय गत्यंतर नाही आणि उर्दू विषयी अकारण निर्माण झालेल्या जिव्हाळ्याने तिला बिलगण्याचा मोह तर आवरत नाही. अशी बहुसंख्य मुसलमानांची अवस्था झाली आहे. भारतामध्ये मुस्लीमांना उर्दूमध्ये शिक्षण देण्याचे धोरण आखण्यात आले आहे. यामुळे परिस्थिती आणखीनीच बिकट झाली आहे. मुसलमान धार्मिकदृष्ट्या अल्पसंख्य असला तरी भाषिकदृष्ट्या अल्पसंख्य नाही. हे सांगण्याची वेळ सरकाररला यावी ह्या सारखे दुदेव नाही. शैक्षणिक माध्यमातून मुस्लीम समाजाला आणखी चांगल्या पध्दतीने मुख्य प्रवाहात आणता आले तर त्यांनाही जागतिकीकरणानंतरच्या आर्थिक विकासाचा फायदा होऊ शकतो. कोणत्याही समस्येच्या मुळाशी सांस्कृतिक आणि आर्थिक विषमता असते. यादोन्ही विषमता दुर करण्याची संधी शैक्षणिक संधीमधून मिळत असते. त्यामुळे दहशतवादावरील लांब पल्याचा उपाय म्हणून शिक्षण धोरणामध्येच योग्य तो बदल करणे उचित ठरु शकते.

**संदर्भ :-**

१) ISIS-The Challenge and the Response, Ed. Shrikant Paranjape, YCNISDA, Sawitrabai Phule University Pune, Kalinga Publication, New Delhi, Published in २०१५.



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya

२) Militant Groups in South Asia, By Surinder Kumar Sharma/Anshuman Behra, Pentagon Press, Published in २०१४.

३) गुड मुस्लीम बॅड मुस्लीम-इस्लाम, अमेरिका आणि दहशवातविरोधी युध्द याबाबत साक्षेपी विवेचन, लेखक-महमुद मजराती, अनुवाद पुष्पा भावे, मिलिंद चंपानेरकर, रोहन प्रकाशन, प्रकाश वर्ष२०१४.

४) International Terrorism and Religions Extremism, Ed.Mahavir Singh, Anamika Publishers, Published in २००४.

५) An Anatomy of Terror-A History of Terrorism, Andrew Sinclair, Maemillan Publication, published in २००३.


**विशेष लेख आणि शोध निबंध :-**


१) The Beliver by William Mccant.
Available at
http://www.brooking.edu/Research/essays/२०१५/thebeliever

२) The Shia-Sunni Divide, CFB.
Available at-http/www.cfr.org/peace-conflict-and-human-right/sunni-shia-divide/P.३३१#१.१

३) Understanding the Taliban and Insurgency in Afghanistan, By Thomas H. Johnson, M.Chris Manson, Winter २००७.

४) Saudi Arabias Soft counterrorism strategy : Preventation, Rehabilitation and After cave by Christopher Boycek, Covnigie Paper, September-२००८.

५) पुनर्भेट हमीद दलवाईची, साप्ताहिक साधना विशेषांक, प्रकाशन-१५, ऑगस्ट-२०१५.




PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya